।। श्री स्वामी समर्थाय नमः ।।

# ।। श्री मल्हारी नवशती ।।


वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे
(B.A.M.S.)



मनकर्णिका पब्लिकेशन

## अनुक्रमणिका


| अध्याय | अध्यायाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| पहिला | ब्रह्मांडनायक अध्याय | |
| दुसरा | सुख अध्याय | |
| तिसरा | समृद्धी अध्याय | |
| चवथा | आरोग्य अध्याय | |
| पाचवा | पापमोचन अध्याय | |
| सहावा | ऋणमोचन अध्याय | |
| सातवा | शापमोचन अध्याय | |
| आठवा | परयंत्रादिक्रिया विनाशक अध्याय | |
| नववा | सखोलज्ञान संपत्ती अध्याय | |

।। श्री ।।

## ।। ब्रह्मांडनायक अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री मल्हारीमार्तंडाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

प्रथम नमितो विघ्नेश्वरा। सकल विद्येच्या दातारा। द्यावा कृपाप्रसाद या पामरा। होतील सर्व सिद्धी प्राप्त।।१।। श्री गणेशा तव चरणी नमुनी। एकच इच्छा जी मनी। सांगतो तुज लीन होऊनी। करावी पूर्ण गणराया।।२।। सदाशिव जो मार्तंडमल्हारी। राही कैसा तो गड जेजुरी। महिमा तयाचा सुंदर भारी। नवशतीत मी वर्णु इच्छितो।।३।। असावी कृपा तुझी मजवरी। वर्णिण्या माहात्म्य अक्षरी। स्थान गड सोन्याची जेजुरी। माहात्म्य शब्दी साकारण्यासी।।४।। दुजी नमिली विद्यादायिनी। शारदा देवी ब्रह्मनंदिनी। माते तव कृपाप्रसादे करूनी। न्यावा सिद्धीस हा ग्रंथ।।५।। चरणी नमितो देवी सरस्वती। बहरू दे माझी वाग्वल्ली। परिमळ असावा भक्तीस्वरुपी। कृपा असावी तुझी सदा।।६।। आता नमितो मम गुरुमाऊली। जी असे भक्तजन साऊली। कृपामूर्ति स्वामी समर्थ माऊली। स्वामीराया

व्हावे प्रसन्न।।७।। ह्या ग्रंथ लेखनाचे कारण। झाली आपुली आज्ञा म्हणून। ग्रंथ तुम्हीच करणार पूर्ण। भक्त गणेश निमित्त मात्र।।८।। नमन माझे मातापित्यासी। सकल तीर्थ आपुले चरणासी। द्यावा आशीर्वाद आपण मजसी। विनम्र असे मी चरणी।।९।। आता नमितो संत सज्जन। असती जे मार्तंड उपासक। तुमचे चरणी माझे वंदन। विनवितो दीजे अवधान।।१०।। नमितो आता म्हाळसा कांता। गणेश सरस्वती नामे धरिता। सारी तुमचीच रुपे तत्त्वता। संपूर्ण देव तुमचेच ठायी।।११।। जैसी भावना ज्यासी राही। तया तैसेची दिसता सर्वाही। आपणा ठायी विकारच नाही। आपण अविकारी आदिपुरुष।।१२।। असे अगाध लीला आपुली। प्रकटवावी आपण या ग्रंथी। हीच नम्र विनवणी चरणी। करावे लीहीते मज आपण।।१३।। अतिशय शुभ्र कैलास पर्वत। तयाचे शिखरी तेज:पुंज। मणियुक्त मंडपी सदाशिव। उमासहीत असती बैसले।।१४।। उमा पुसतसे सदाशिवासी। आपण भक्तकामकल्पद्रुम प्रत्यक्षी। आर्त एकची असे मम मानसी। पुरवावे आपण स्वामिया।।१५।। प्रीती बोल ऐसे ऐकूनी। पिनाकपाणी बहु हर्षिले मनी। म्हणती बोल गिरिनंदिनी। काय इच्छा असे मनी।।१६।। म्हणे मृत्युलोकी जे वसती। तयांसी जरामरण असे निश्चिती। कलिदोषे जे पीडीत असती। ते जन कैसे उद्धरतील।।१७।। शिव सांगती कृतयुगाचे ठायी। सत्य वर्तती सर्वही। दीर्घायुषी आरोग्यताही। तपोधन ही बहु असती।।१८।। परि पूर्व कर्म भोग हे गहन। ब्रह्मादिका न येती कळुन। पीडीले त्यामुळे थोर ब्राह्मण। दु:ख दारिद्र्य व्यथे ती।।१९।। आपुली घरे कुटुंब सोडून। ऋषी हिंडती घोर

विपित। परी न लाभे तया समाधान। शिव शिव म्हणत विश्वासिती।।२०।। ऐसे बलहीन विप्र झाले। परि तयांचे पूर्वपुण्य फळास आले। तयांनी सनत्कुमारा देखिले। साष्टांगे तयासी वंदिती।।२१।। वंदन करुनी त्या तोषविले। दु:ख आपुले निवेदिले। सनत्कुमार वदे कळवळे। तुमचे नष्टचर्य संपले आता।।२२।। आता होऊनी सावधान। ऐका एकाग्र करुनी मन। कथाश्रवणमात्रे करून। सर्व पातके नाश पावती।।२३।। मणिपुर नामे असे नगर। नगराधिपती असे मल्लासुर। कनिष्ठ बंधु मणि असुर। राज्य करी जैसा इंद्र।।२४।। पातक तयाचे झाले बहुत। पुण्य सरले असे निश्चित। दुर्बुद्धी उपजली त्याचे मनात। ब्रह्म द्वेषास तो प्रवर्तला।।२५।। ऋषी आश्रमा येई सैन्यासह। पीडीले ऋषींसी बहु करून। स्त्रियापुत्रांसी त्रास देऊन। केला पूर्ण विध्वंस त्याने।।२६।। मग प्रबुद्ध ऋषी एकत्र येऊन। करीते झाले ते निदान। शत्रुक्षय करावा म्हणून। निश्चय केला सर्वांनी।।२७।। स्थळ हे सोडून जावे त्वरीत। पहावे अन्य स्थळ निवांत। तेथे कुटुंबे होमपात्रासहीत। नेऊनी आधी ठेवावे।।२८।। ऋषी समस्त क्लेशयुक्त। वारंवार स्फुंदस्फुंदी रडत। झालो अनाथ मुखी म्हणत। म्हणती आम्हा नाही त्राता।।२९।। ऐसे ऋषी त्रासिले मनी। भेटले तयांना नारदमुनी। पाहुनी अति आनंद मनी। जाहला समस्त ऋषींसी।।३०।। त्यांची ऐसी अवस्था पाहुनी। बहुत कळवळले नारदमुनी। पुसती प्रेमे ऋषी लागुनी। का ऐसी अवस्था झाली।।३१।। तेव्हा ते धर्म पुत्र सात जण। तर्पे जैसे सहस्त्रकिरण। माजी वरिष्ठ धर्मांगवीत जाण। दुजा धर्मपालक जाणीजे।।३२।। तिसरा धार्मिक तपोराशी। चवथा धर्ममील

तेजोराशी। पाचवा धर्मज्ञ महाऋषी। तपोतेज त्याचे आगळे।।३३।। सहावा धर्मबाहुजाण। सातवा असे धर्मकौतुक। तेपोतेज जैसे अर्क। विख्यात असे सर्वांसी।।३४।। ऐसे ते सात तपोराशी। वृत्त सांगती नारदासी। म्हणती पीडीले मल्ले आम्हासी। झालो अनाथ आम्ही स्वामी।।३५।। आश्वासिती तया मुनी नारद। म्हणती दैत्य नाश पावेल। त्याचे पुण्याचा झाला क्षय। तुम्हा त्रासितां झालासे।।३६।। जावे तुम्ही आता इंद्रभुवना। सांगा वर्तमान पाकशासना। तो जैसी देई आज्ञा तुम्हा। तैसेची तुम्ही आचरावे।।३७।। ऋषी म्हणती सांगा नारदा। आमचे कुटुंबाची न राहे मर्यादा। निवांत स्थळ रक्षिण्या प्रमदा। सांगावे तुम्हीच आम्हासी।।३८।। नारद सांगे कृष्णा वेणी संगम। उत्तरेस असे योजने सात। विख्यात असे धवलगिरी पर्वत। त्याचे उत्तरेस लवथळ तीर्थ।।३९।। तेथे असे लवथळेश्वर लिंग। नसे तेथे दैत्यसंचार। दुर्वासे शापिला असे राक्षस। त्याचा इतिहास सांगतो।।४०।। पूर्वी तपोधन दुर्वास समर्थ। लव शिष्य त्याचा गुरुभक्त। सेवा करुनी तोषविला गुरुनाथ। परमभक्ती करूनीया।।४१।। शिष्ये प्रार्थिले सद्‌गुरूंसी। एकच इच्छा असे मानसी। करावे निर्विघ्न तपासी। दैत्ये आम्हासी न पीडावे।।४२।। गुरु म्हणती हा धवलगिरी पर्वत। न येतील येथे कोणी दैत्य। येता येथे होतील भस्म निश्चित। माझे वचन सत्यची असेल।।४३।। त्या दिवसापासूनी असुर। न जाती त्या स्थळासी साचार। तुमची कुटुंबे तुम्ही सत्वर। नेऊनी तेथेची ठेविजे।।४४।। मग ऋषी नारदास सांगुन। करती सकुटुंब तेथे गमन। ते आले धवलगिरी समीप। लवथळेश्वर लिंग पाहुन संतोषले।।४५।। मग पर्वत दरी

लक्षुन। गूढ स्थान रम्य पाहून। तेथेची मग पर्णकुटी बांधुन। धर्मात्मज सुखे राहीले।।४६।। मग कुटुंबाची स्वस्थता करुन। पायी सिद्ध पादुका घालुन। आकाशमार्गी करिता गमन। आनंद मनी न समाये।।४७।। आले ते अमरावती नगरीसी। उभे राहीले महाद्वारासी। सांगती ऋषी द्वारपाळासी। भेटणे इच्छितो देवेंद्रासी।।४८।। मग द्वारपालाचा अधिपती जाण। सवे घेऊन हे ब्राह्मण। नगरामाजी प्रवेश करुन। राजमार्गी ते निघाले।।४९।। ब्राह्मण महाद्वारासमीप आले। हे इंद्रासी जाणवले। शक्रे दूतांस आज्ञापिले। ऋषींसी सत्वरी आणावे।।५०।। ऋषी महाद्वारातून प्रवेशले। ते इंद्र सभेस देखते झाले। अतितेज असे विस्तारले। कोटी कोटी विद्युल्लते ऐसे।।५१।। सभांगणी ऋषींसी पाहून। इंद्र सिंहासन टाकून। झडकरी उठे त्वरे करुन। ऋषिदर्शना लवलाही।।५२।। इंद्रे पूसिता सांगती ऋषी। मणि मल्ल पीडीती आम्हासी। त्यांनी विध्वंसिले यज्ञकुंडासी। केले आम्हा दुःखी देवेंद्रा।।५३।। ऐकून इंद्र झाला खिन्न मनी। म्हणे दैत्य मज छळी निशिदिनी। करी तयाचे मी दास्य म्हणोनी। तुम्ही जावे विष्णुभुवनासी।।५४।। ऋषी म्हणती जाऊ वैकुंठासी। निवेदु वृत्त श्रीविष्णुसी। तोच कार्य करेल निश्चयेसी। यात संशय नसेची।।५५।। धर्मात्मज विष्णुचे ध्यान करून। पायी दिव्य पादुका घालुन। आकाशमार्गी करती गमन। वैकुंठाप्रती शीघ्रगती।।५६।। तेथे दिव्यांगना रंभादि नृत्य करती। चित्ररथ गंधर्व तेथे गाती। नारद तुंबर हरीस तोषविती। एकादश रुद्र अष्ट वसु ही वसती।।५७।। मध्ये असे सिंहासन सुंदर। सिंहासनी विराजती रमावर। आयुधही उभा जोडोनी कर। वामांगी जगज्जननी

शोभतसे।।५८।। विष्णुचे स्वरुप वर्णावयासी। वेदांसी न सुचे बोलावयासी। शास्त्रे प्रवर्तती विवादासी। तेथे मी पामर काय वर्णू।।५९।। ऐसा भगवान लक्ष्मीपती। पहाते झाले ब्रह्म मूर्ती। ऋषींचा आनंद न समाये चित्ती। प्रेमाश्रु नयनीं वहातसे।।६०।। मग ऋषी सावध होऊन। करिती श्री विष्णुचे स्तवन। मग परम विनये करुन। वृत्त आपुले निवेदिती।।६१।। त्रासिलो आम्ही मणिमल्लाकडून। सांगितले जाऊन इंद्रालागून। परी आमुचे वृत्त ऐकून। म्हणे जावे विष्णु प्रती।।६२।। तरी आपण कृपाळू होऊन। मणिमल्ल वधावे दुर्जन। ऋषींचे ऐसे ऐकून वचन। विष्णु तयांसी सांगतसे।।६३।। म्हणे ते दोघे पापमती निशाचर। त्यांणी पूर्वी तप केले दुर्धर। तेणे तोषला सावित्रीवर। अचाट वर दिधलासे।।६४।। त्या वरदें करून दोघे जण। परम प्रतापी बलसंपन्न। कोण्हास न मानिती दुर्जन। विख्यात असती सर्वांसी।।६५।। तरी तुम्ही जावें कैलासासी। स्तवने तोषवावे शिवासी। तो संतुष्ट जालिया दैत्यांसी। क्षणामाजी निवटील।।६६।। श्री हरि म्हणे गा ब्रह्ममूर्ती। तुम्ही खिन्न न व्हावे चित्ती। तुमचे मनोरथ पुरवील उमापती। चिंता सर्व सोडीजे।।६७।। श्रीहरीचे वचन श्रवण करुन। ऋषींचा हर्ष उचंबळून। सर्व जयजयकार करून। कैलासाप्रती चालले।।६८।। कैलास पर्वताचा मार्ग सुंदर। मृत्युलोकीहून असे साचार। याचा इतिहास केदारकल्पी निर्धार। केला असे निश्चयेसी।।६९।। केदार ही अक्षरे तीन। जो नित्य उच्चारी भक्ती करून। तो अंती जाई विमानी बैसोन। शिवलोकी आनंदयुक्त।।७०।। भूमीवरून जाण्या कैलासलोक। मार्ग ते असती अनेक। त्याच मार्गांतील एक। केदारावरूनी

असे।।७१।। दुसरा मार्ग जाणे सिद्धीबळ। तिसरा तो योगबळे। चवथा मार्ग जाणे मनोवेगे। ही कला फक्त नारदास असे।।७२।। पाचवा मार्ग विमानारूढ होऊन। पुण्यवंत जाती आनंदे करून। परी पादचारी जाती साधने करून। कथा असे केदार कल्पी।।७३।। केदार कल्पीचा सारांश घेऊन। कथा लिहीली कौतुके करून। ज्याचे पदरी जन्मोजन्मीचे पुण्य। त्यासीच इच्छा उपजतसे।।७४।। यात प्रथम गुरु करून। तयाते प्रसन्न करवून। अघोर मंत्र घ्यावा मागुन। त्याचे पुर:चरण सुखे कीजें।।७५।। अघोर मंत्राचे पुरश्चरणें करून। देह होई पवित्र जाण। वनस्पतीचे रससेवनें करून। देह पवित्र दृढ होत असे।।७६।। मनाने वैराग्य संपन्न होऊन। सकल तीर्थांचे करून स्नान। मग पाही आनंदकानन। जे क्रीडास्थान शिवाचे।।७७।। तेथे काही दिवस वास करून। हृदयी त्रिपुरारीते स्मरुन। नित्यनेमे अघोरमंत्र जप करून। कैलासी जावयाची इच्छा करावी।।७८।। ऐसा सिद्ध गमन करी तेथून। श्रीकेदारीचा मार्ग लक्षुन। श्री गंगा उगमस्थान लक्षुन। केदार नयनी अवलोकी।।७९।। श्रीकेदारास सव्य घालून। त्वरीत रेत कुंडापासी येऊन। रेतकुंडी करिता आचमन। हृदयी लिंग होय जाण।।८०।। त्या कुंडी त्रिकाळ स्नान करी। त्यासी शीत न बाधी यावरी। मग महापंथाचा मार्ग विचारी। पुजारियासी प्रेमाने।।८१।। तो म्हणे जो जाण्या सिद्ध झाला। त्याने भेटावे येथील नृपाळा। त्याची आज्ञेवाचून दयाळा। जाणे कदा न घडे सत्य।।८२।। मग सिद्ध ये नृपसभेमाजी। म्हणे मज

जाणे कैलासपुरी। आज्ञा तैसी द्यावी मजलागी। नृप म्हणे हा मार्ग कठिण।।८३।। सिद्ध त्या नृपाची प्रार्थना करून। नृपाज्ञा घेतसे मागून। मग सर्वसंग परित्यागून। दिगंबर दिक्षा घेई जे।।८४।। तेव्हा सर्व जन मिळून। करिती सिद्धाचे पूजन। कैलासी जावयाचा मार्ग दाखवून। देती त्या सिद्धाप्रती।।८५।। पुढे गणपतीचे देवालय असे। ते पाहून सिद्ध संतोषे। गणपतीस नमून स्तवन करीतसे। अति आनंदित होऊन।।८६।। ऐसे अनेक स्तवने करून। प्रार्थिलासे तेणे गजवदन। मग गणपतीस सव्य घेऊन। कैलासाचा मार्ग लक्षी।।८७।। मुखी अघोरमंत्र जप करी। हृदयी ध्यायी कामारी। मार्ग क्रमितसे अक्सरी। दिवस रजनी न सूचे तया।।८८।। बर्फाचा पर्वत उल्लंघीत बहुत। त्यास श्रम न होय किंचित। सिद्ध आनंदतसे मनात। म्हणे धन्य भाग्य आमचे।।८९।। मार्गी अनेक विघ्ने उद्भवती। मंत्र सामर्थ्ये नाश पावती। सिद्ध उल्हासित होई चित्ती। म्हणे शिव करील कृपा।।९०।। अर्धचंद्र शिळेपासी येऊन। सिद्ध बैसे विश्रांती पावोन। मार्ग चुकला नाही म्हणून। आनंद चित्ती मानतसे।।९१।। मार्गी नगर देखे लखलखीत। नगरवासी जन येती धावत। राव सामोरे येऊन विनवित। परी सिद्ध सर्व विषयी विरक्त।।९२।। सिद्धाचे वैराग्य पाहोन। संतोषविती नगरवासी जन। मग कैलासीचा मार्ग दाखवून। देती सिद्धास आनंदे।।९३।। ऐसी सोळा नगरे क्रमुन। पुढे सिद्ध करीतसे गमन। तव चंद्रपर्वत दुरून। पाहता झाला निजभाग्ये।।९४।। सिद्ध करी अघोरमंत्र पठन। संतुष्ट झाले इंद्राचे मन। त्याने सिद्धास दिव्यदृष्टी देऊन। संतोषविले त्या सिद्धास।।९५।। सिद्ध आनंदून मानसी। म्हणे

जय जय कैलासवासी। दर्शन दीजे जी दासासी। कृपा करूनी दातारा।।९६।। ऐसा सिद्ध पावे मेरू पर्वती। तेथे तीन बरेगे? शोभती। सत्य लोकाचळ अन् वैकुंठाचळ। तेथेच असे शुभ्र कैलास।।९७।। सिद्ध पाही महाद्वार। म्हणे दाखवा मज शिवचरण। हर्षसंपन्न होऊन शिवगण। अवश्य म्हणती चलावे।।९८।। गण आणि सिद्ध दोघे जण। द्वारी गणेशास वंदून। नंदीस प्रार्थी तो गण। म्हणे सिद्धास शिवचरण दाखवी।।९९।। जयनंदी सिद्धास करी धरून। शिवा सन्निध उभा प्रेमे करून। देई सिद्धास शिवदर्शन। सिद्ध चर्मदेही कैलासी पोहोचला।।१००।।

श्री मल्हारीमार्तंड चरणार्पणमस्तु । श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।

हा अध्याय करीता पठण। भक्ताचे सदैव करीती रक्षण। कलीयुगातील असतील दोष सकल। स्मरोनी मार्तंडासी त्वरीत नाशवील। ॐ जागृत चैतन्याय मल्हारी मार्तंडाय नमः। हाची खरा सिद्ध मंत्र। जप करूनी अहोरात्री। सिद्धीस नेई या जड विश्वाचे तंत्र।

।। श्री ।।

# ।। सुख अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री मल्हारीमार्तंडाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमितो नम्रत्वे म्हाळसाकांतासी। लीला अगाध त्याची सर्वस्वी। करावे लीहीते या स्वामीभक्तासी। प्रकटवावी आपुली लीला।।१।। सांगे कैलास महीमा सनत्कुमर। पाहती धर्मपुत्र शुभ्रपर्वत। तेजे झाकती नेत्र अकस्मात। गेले गोंधळून ऋषी सर्व।।२।। करिता तयांनी शिवपंचाक्षरी जप। झाली दिव्य दृष्टी ऋषींस। न्याहाळती कौतुके कैलासपर्वत। सर्व सौंदर्य लक्षणयुक्त।।३।। पर्वते असती चंद्रकांत पाषाण। लिंपीला तो हरि चंदने करून। विहरती वनकुंजर थवे संपूर्ण। तुरंग समीरा ऐसे धावती।।४।। पर्वती आम्र अशोक सघन। कंदप चंपक हरिचंदन। तमाल फणस बदरी रक्तचंदन। नानापरींचे वृक्ष शोभती।।५।। व्याघ्र ष्टग वृक श्वापदे असती। तैसेच शुक मैना बक पक्षी। कोकिला कारंडव चक्रवाक पक्षी। अनेक वसती कैलास पर्वती।।६।। रंभाफळ नारिकेल पुगीफळ वृक्ष।

नागवेली कंकोळ वेली करून। तैसेची शोभती मंदार वृक्ष। पार्वती सख्या वेचिती फुले।।७।। ऋषी चालती शिवपद स्मरुन। तव अकस्मात देखिले शिवनगर। ज्याचे नाव भोगाख्यनगर। दुरुन ऋषी दंडवत घालती।।८।। पुढती जाऊन ते धर्मनंदन। महाद्वारी गणास नमून। म्हणती करवावे शिवदर्शन। शिवांध्यक्ष गणास देई आज्ञा।।९।। ऋषी महाद्वारा समीप आले। तव द्वारी गजवदनास पाहिले। साष्टांग प्रणिपात करते झाले। राहीले उभे कर जोडोनी।।१०।। शिवनंदी शिवाचा लाडका गण। सुवर्णवेत हाती घेऊन। शिवसभेस गेला ऋषींस घेऊन। सभा शोभे ऋषी वेडावले।।११।। सभासद गुरू शुक्र थोर। अष्टसिद्धी तैसेच मरुद्‌गण। अष्ट वसु एकादश रुद्र। कुबेर तिष्ठतसे हात जोडून।।१२।। पूर्वेस इंद्र आग्नयेस अग्नी। नैऋत्येस नैऋती कृतांत दक्षिणेसी। वरुण उभा पश्चिम दिशी। सूर्य तेज शांत करून शोभे।।१३।। चंद्र चातुर्ये शिवमस्तकी राहून। समीप भागी कमलासन। तैसाच विष्णु सामवेदे करून। स्तविताती शिवासी।।१४।। सुरवर भैरव समुद्र नद्याही। वेदशास्त्रे पुराणे उपपुराणे ही। नवग्रह नवनाग सहस्त्रवदनही। सकलविद्या कला स्तविती शिवासी।।१५।। निर्गुण निराकार अगोचर। भक्तांसाठी झाला साचार। त्रिशुल डमरू खड्‌गयुक्त कर। परमतेजे प्रकटला शिव।।१६।। वासुकी नाना रत्नमाला शोभत। रुद्रमाळा ही मिरवे तयासहित। बालार्कासमान चारूरुप शोभत। पंचमुखी प्रकटला शिव।।१७।। पश्चिम उत्तर सद्योजात नामदेव। पूर्व दक्षिण तत्पुरुष अन् अघोर।

मध्यमुखाचे नाम ईशान। ऐसा पंचमुखे शोभत शिव।।१८।। मुख निर्मळ हास्ययुक्त सुंदर। दंतपंक्ती शुभ्र निर्मळ। वामांगी शोभे मृडानी थोर। अमृतस्वरुपी प्रत्यक्ष शिव।।१९।। मृडानी रुप अतिकांतिमान। नेत्रकमळे नीलोत्पला सम। सरळ नासिका आरक्ताधर। त्रिवेणी सुंदर भुजंगाकृती।।२०।। साजिरे गोजिरे ऐसे रुप। झाला पंचवदनही कामपीडित। वर्णु शोभा काय मी पामर। आदिमाया ईश्वरी प्रत्यक्ष ।।२१।। ऐसे उभे तिष्ठती निराकार सगुण। सामोरी उभे नंदी शृंगी गण। ऋषी हृदयी पंचाक्षरी जपुन। पाहती रुप उमा शिवाचे।।२२।। धर्मात्मज उभे होऊनी शरण। भावे स्तविते झाले पंचवदन। पिनाकपाणी फणिभूषण। बोलता झाला ऋषींसी।।२३।। पूसे कोणते दुःख दारूण। करावे मजसी निवेदन। ऋषी म्हणती मणिचूल दैत्य दारूण। छळिले त्यांनी आम्हासी।।२४।। मणि मल्ल दैत्य एकोदर। ब्रह्मदेवाकडून घेतला त्यांनी वर। छळिती सर्वा उन्मत्त होऊन। नसे समर्थ त्या जिंकाया।।२५।। भूलोकाचे ठायी राहून। त्रैलोक्याचे राज्य करती आपण। आज्ञाभंग होता तत्क्षण। इंद्रादिकांस शिक्षा करती।।२६।। त्याने केले आमचे सर्वस्वहरण। यज्ञधेनुही वधिल्या संपूर्ण। स्त्रिया पुत्रांस बहु त्रास देऊन। मल्ल दैत्य गेला स्वनगरी।।२७।। ऐसे ऋषिवचन ऐकोनी। शिव म्हणे दैत्य पापखाणी। झाला उन्मत्त विधि वरदे करूनी। सकळ श्रुत असे आम्हासी।।२८।। त्यासी तपसामुग्री असे खासी। परी सरली आता निश्चयेसी। स्वस्थचित्त व्हावे तुम्ही मानसी। मारीन निश्चित मी तयासी।।२९।। ऐसे कोपे

वदून पंचवदन। हास्य केले अट्टहासे करून। मग सिंहासनावरून उतरून। जटा आपटल्या भूमीवरी ।।३०।। शिवजटेतून महामारी। उत्पन्न झाली देवी सुंदरी। ऋषींनी शिंपीली घृतेकरूनी। म्हणून नाम तिचे घृतमारी।।३१।। ती घृतमारी कर जोडून। शिवापुढे उभी अनन्यशरण। शिव म्हणे भक्षी दैत्यसैन्य। रक्षी सकल ऋषींचे कुळ।।३२।। शिवाचे ऐसे वचन ऐकोनी। घृतमारी संतोषली मनी। म्हणे जय जय पिनाकपाणी। आज्ञा प्रमाण मज तुझी।।३३।। ऐसे सांगे सनत्कुमार ऋषींस। कथा ही ऐसे पापनाशक। शिवचरित्र महिमा असे पवित्र। श्रवणमात्रे कलीदोष हरती।।३४।। शिवचरित्र करिता श्रवण। सकल देव होती वश जाण। शिवे मार्तंडरूप धरण्याचे कारण। आता निवेदितो तुम्हासी।।३५।। सकल ऋषींनी स्तवनी सूचविले। पंचवक्त्रे वध न होय वहिले। म्हणोनी शिवे एकवक्त्र धरिले। निशाचर वध करण्यास्तव।।३६।। पंचवक्त्र झाले एकवक्त्र। खदिरांगारसारीखे नेत्र। क्रोधे शरीर झाले तप्त। चारी हाती आयुधे शोभती।।३७।। तप्त कांचनासम पीत वर्ण। वरी हरिद्रा चूर्ण उधळण। तेजे दिसे अतिशोभायमान। पाहता नयन झाकती।।३८।। मस्तकी मुकुट रत्नजडीत। वरी अर्धचंद्र विराजीत। त्रिनेत्र, गळा मुंडमाळा मिरवत। तेजस्वी रुप वर्णने अशक्य।।३९।। चैत्र शुद्ध पौर्णिमेचे दिवशी। मार्तंडभैरव रुप धरी पशुपती। आनंद न मावे त्रिजगती। इंद्रादिदेव पावती हर्ष।।४०।। सिंहासनावर पंचवक्त्र मूर्ती। तोची अकस्मात झाला एकमुखी। देव ऋषी मनी आश्चर्य करती। म्हणती अगाध लीला शिवाची।।४१।। शिव गणांसी आज्ञा करुनी। देवांसी आज्ञापी गंभीर वाणी।

म्हणे आपापली शस्त्रे घेऊनी। सत्वर युद्धालागी चलावे।।४२।। भयंकर तयाचा शब्द उठला। म्हणौनी भैरव नाम पावला। पीत रक्त वर्ण एक झाला। म्हणोनी मार्तंड नाव तयाचे।।४३।। तेणे सूर्या ऐसी तनु धरली। भयंकर शब्दे बैसे कोटाळी। म्हणौनी मार्तंड भैरव तये वेळी। देव ऋषी बोलती।।४४।। मार्तंडभैरवाची आज्ञा वंदुनी। निघाले इंद्रादिदेव सेना घेऊनी। वाहने आपुली सज्ज करुनी। सकल देव निघाले युद्धास।।४५।। कैलास पर्वत अति विस्तीर्ण। तेथे आपुली सेना उभी करुन। सेनानायक सांगे शिवसभेत जाऊन। आपुली सेना सिद्ध असे।।४६।। शिव तेव्हा सिंहासनावरूनी उठुनी। हर्षयुक्त नंदीवर बैसोनी। सभोवते सप्त कोटी गण मिळोनी। जयजयकारे गर्जवी।।४७।। वामांगी तयाचे गिरिजा सुंदरी। हीच माया मूळ पुरुषाची। हीस म्हणती महालया म्हाळसा। हीची शक्ती वर्णु कैसी।।४८।। ऐसी ती महामाया भगवती। भक्त कामधेनु जीस म्हणती। ती बैसोनी वामांगाप्रती। जयप्रद सर्वा जाली असे।।४९।। सेनापती दाखवी सैन्य वर्णुन। संतोषोनी बोले चंद्रभूषण। म्हणे सकळांस आज्ञा करून। भूतळासी चलावे।।५०।। ऋषी स्तविती भैरवालागून। म्हणती आधी आश्रमी येऊन। मग जावे दैत्य वधालागून। ऐशी आमुची असे विनंती।।५१।। सकळ गणासहित मार्तंड भैरव। उतरले ससैन्य मेदिनीवर। झाला ऋषिवर्या आनंद थोर। ऋषीभार्या धावल्या ओवाळण्या।।५२।। आले ऋषी आपुले आश्रमी। पूजिते झाले आनंदे शिवासी। संतोषोनी शिव बोले तयांसी। निर्भय तुम्ही असावे।।५३।। तेथे त्रिराती क्रमिल्या पाही। सकळ भूप धावले लवलाही। आपुले सैन्य घेऊनी

सर्वही। शिवदर्शना सकळ पातले।।५४।। वाद्ये विविध वाजती बहुत। काहाळा मृदुंग तुरे गर्जत। अट्टहास्य करून वाजती शंख। ऐकता वीरांसी येई स्फुरण।।५५।। ऐसे सैन्य पाहुनी शिवाचे। हेर सांगू धावती मल्लाचे। सांगती अरिष्ट उदेले साचे। वरी गती नसे स्वामिया।।५६।। मणिचूल पर्वता समीप। देव शिबिरे देऊनी उतरले अमूप। सभोवतें अष्ट भैरव सेने समीप। रक्षिताती ते सेनेसी।।५७।। दूत ऐसे बोलोनी त्वरीत। गेले आपल्या स्थाना प्रत। मल्ल झाला मनी साशंकीत। सभा सत्वर विसर्जिली।।५८।। घेई मणिदैत्य बंधूस बोलावून । करीती विचार एकांती बैसून। मणि बोले मग कर जोडून। बोलवा सुबुद्धी प्रधानास।।५९।। एकांती बैसले तिघे जण। म्हणती शिव घेऊनी आला सैन्य। यासी काय असे कारण। घ्यावे आपण जाणून।।६०।। प्रधान सूचवितसे मल्लासी। पाठवावे हेर शिवा पासी। कळेल गुप्त वर्तमान आपणासी। मग योजना करु याची।।६१।। मल्लासूर फार दचकला मनी। करीतसे तो विचार अंतरी। बाह्यात्कारे धीर धरूनी। वृथा गर्जुन बोलतसे।।६२।। म्हणे असे इंद्र परम नष्ट। याचा स्नेह ठेवू नये स्पष्ट। देव असती बहुत दुष्ट। यांची उपेक्षा म्या व्यर्थ केली।।६३।। इकडे प्रधान हेरांसी सांगे। गुप्तरुपे देव सैन्यात जावे। तेथे सेनानायक कोण आहे। त्वरीत आम्हासी सुचवावे।।६४।। चौघे दूत अणुरेणू सम होऊन। शिवापाशी गेले दोघे जण। पोचले दोघे देवेंद्रापाशी जाऊन। गुप्तरुपे ते तेथे राहती।।६५।। तेथे जे चेष्टित होय निश्चित। ते वर्तमान मल्लास पोचवीत। ऋषींस मल्लासुरे त्रासिले बहुत। म्हणूनी शिव आलासे।।६६।। साशंकीत खिन्न झाला मल्लासूर।

प्रधाने जाणून हे दुश्चिह्न। म्हणे जी बळसिंधु आपणासमान। नसे ब्रह्मांड गोलामाजी।।६७।। तुजसी काय युद्ध करी वृत्रारी। तेथे महेश काय भिकारी। न राहु शकती तुज समोर समरी। युद्धी आपणच जय पावू।।६८।। ऐकोन दैत्य चित्ती संतोषला। उत्साह समुद्र त्याचा उंचबळला। मग पाचारूनी वार्तिकाला। निजप्रतापें आज्ञा करी।।६९।। म्हणे करा त्वरा सत्वर। पाचारुनी आणा दैत्य सत्वर। जो सकल देवसैन्याचा संहार। करू जाणतसे क्षणमात्रें।।७०।। सेनापतीस वंदुन सत्वर। दैत्य पावले राजद्वार। तो देवसैन्याचा घोष थोर। ऐकोनी ते हास्य करती।।७१।। एकासी एक करिती विचार। देव जिंकीले सहस्त्रवार। आज उत्साह दिसतो थोर। शिव साह्यकारी म्हणोनीया।।७२।। तो क्रियाभ्रष्ट असे पाकशासन। जाऊनी मिळाला भिक्षुकालागुन। आता समरी जीवे मारीन। कीवची न करु तयाची।।७३।। ऐकोनी ऐसे मल्लासुर वचन। सर्वांनी केला जयजयकार। म्हणती आज्ञा द्यावी सत्वर। निर्जर (देव) सकल भक्षिण्या।।७४।। सेनापती विनवी द्या तांबुल। पैजे देव रणी मारीन। बैसा आपण स्वस्थ चित्त करुन। पहावे कौतुक सेवकाचे।।७५।। सेनापतीचे वचन ऐकोनी। मल्ल हर्ष निर्भर मनी। म्हणे मी देतो ते क्रमेकरूनी। देववी तू बुद्धिवंता।।७६।। सेनापती म्हणें जी दैत्येंद्रा। तुझ्या औदार्य शक्तीची मर्यादा। कोण कैसी जाणे दातारा। वर्णवे कैसी या पामरा।।७७।। शुराद्रतासी दिला ऐरावत। कौशलास दिला विद्युत्प्रायरथ। उद्धतासी दिला हेमरत्नी कुंजर। ऐसा उदार तू दातारा।।७८।। देवशैल्यासी पशुपती नाम गज । सौरीभास हिमवंत नाम कुंजर। सुरेंद्रदर्पदलनास

कर्पूरवर्ण अश्व। चंद्रकोपासी चार अश्वरथ।।७९।। सिंधुनादास मदोन्मक्त कुंजर। गोमुखास इंद्रनील अश्व। धूर्मवर्णास श्यामकर्ण सज्ज रथ। देऊनी सेनानायकांस संतोषवी।।८०।। शूर्पकर्ण असे अभिधान। त्यास सुवर्णवर्ण अश्व योजून। रत्नखचित रथ ध्वज कृष्णवर्ण। देऊनीया गौरविला।।८१।। अशी काही सेनानायकांची नामें। वर्णिली संक्षिप्ते करून। त्यांसी छत्र चामरे देऊन। प्रियवाक्ये गौरवी दैत्यपती।।८२।। याहून दैत्य असती रणशूर। युद्धालागी परमचतूर। ऐसे छत्तिस दैत्य थोर। असती दैत्य सैन्यामजी।।८३।। सुरासेन असिजिव्हा नाम। कुंत जिव्हा चवथा कुंभकर्ण। त्रिलोचन उदग्राख्य नाम। दुर्मद स्मश्रुरुन्नत दारूण दैत्य।।८४।। ऐसे नानामिधानी दैत्य। कोणी व्याघ्रादि विलक्षण। कोणास असती मस्तके तीन। कोणाचे केसे शूलाऐसे।।८५।। ऐसे दैत्य गर्जती ओरडती। कोणी अश्वासम हिंसती। कोणी खळ स्थूळ देही असती। तयांसी सत्कारे दैत्यपती।।८६।। रथ अश्वगजांच्या पंक्ती। मल्ले दारी उभ्या केल्या निगुती। जे जे आवडे ज्या ज्या प्रती। म्हणे जावे घेऊनी सुखे।।८७।। सेनापतीस आज्ञा केली। आला युद्धास चंद्रमौळी। युद्धाची माजेल फळी। हे धन रत्ने सर्वास द्यावी।।८८।। इंद्रे आपली क्रिया सोडून। युद्धास आणिला त्रिनयन। तरी आता रणी त्यास मारुन। आमुचे प्रिय तुम्ही करावे।।८९।। आता मृत्युने ग्रासले देव। सरले तयांचे आयुष्य। करतील सारे संग्रामी पलायन। परी मी तयांस न सोडी।।९०।। म्हणे आता न कीव करु। शिव भिकारी तयासी मारु। इंद्ररक्ते तर्पण करु। आम्ही निज पितरांचे।।९१।। ऐसे सर्वासन्मुख बोलून। हासून बोले हा संग्राम

कवण। तुम्ही आपले सैन्य सिद्ध करून। शिबिराप्रती राहीजे।।९२।। मल्ल सिंहासनावरुनी उठला। सर्वांनी जयजयकार केला। सेनापती आज्ञा वंदून निघाला। स्वसदनाप्रती तो जातसे।।९३।। मल्ले सुबुद्धी प्रधान बोलविला। अभ्युत्थान देऊन सन्मानिला। दैत्य विचार पूसे प्रधानाला। कैसे आता करावे।।९४।। सुबुद्धी म्हणे बलसंपन्न आपण। तुम्हासमान न दुजा जाण। काय हे दुरीत मनात घेऊन। होता साशंकीत स्वामी या।।९५।। ऐकोनी उठला दैत्येंद्र पेटुन। क्रोधे सभेमाजी येऊन। दिव्यांबर परिधान करून। सिद्ध झाला युद्धासी।।९६।। तैसाच मणि दैत्येश्वर। मल्लाचा बंधू एकोदर। तो गजस्कंधी बैसे रणधीर। परमतेजे शोभतसे।।९७।। हेर हे वर्तमान शिवास सांगती। ऐकोनी शिव हास्य करती। म्हणे वृत्रारी चिंता नसावी। दैत्यास लावीन समरी शिक्षा।।९८।। तुम्ही स्वस्थचित्ते करून। असावे आपुले सैन्य रक्षुन। सकळ देवांसी आज्ञापून। असावे सावध निशीदिनी।।९९।। शिवे पाशुपत अस्त्र अभिमंत्रून। सभोवती त्रिशूळ ठेवला रक्षण। नेत्रपातें हालता जाण। सहस्त्र आवर्ती होतसे ते।।१००।।

श्री मल्हारी मार्तंड चरणार्पणमस्तु । श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।

हा अध्याय करीता पठण सुख समृद्धी घरात नांदेल। शत्रुपीडा नाशवी सकल सदा गृहामध्ये आनंद पुरवील। अघोरी विद्या जारणादी असेल भयंकर। स्मरीता मार्तंडासी पुरती शमवील।

।। श्री ।।

# ।। समृद्धी अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री मल्हारीमार्तंडाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री मल्हारीमार्तंड कथा। कैसी गुंफु याची कविता। श्री स्वामी समर्था तुम्ही आता। द्यावी मती या निजभक्ता।।१।। मल्ल दैत्ये त्रासिले देव ब्राह्मण। करण्या तयांचे रक्षण। साक्षात शिव झाले सज्ज जाण। कथा सुरस त्या युद्धाची।।२।। मल्ल सांगे सुबुद्धी प्रधानास। यंत्र देतो मी सिद्ध करून। ते स्तंभाखाली ठेवीजे नेऊन। भंग होईल शत्रु सैन्याचा।।३।। मग सांगे सुबुद्धीस। पाठवा कोणीतरी शिष्टाईस। बोधून मोहवावे इंद्रास। मगच आपण कार्य साधु।।४।। प्रधाने योजिला दैत्य शरभानन। बहु गौरविला वस्त्रालंकार देऊन। अति आनंदे तो शिबिकेत बैसोन। देवेंद्र सभेत पोहोचला।।५।। शरभानन बोले मधुमधुर वचन। तुम्ही ऐसे शिवासी घेऊन। झाला सज्ज युद्धास संपूर्ण। हे उचित नसे तुम्हासी।।६।। मल्लासुराचे तुमचे सौरस्य। यथाक्रम चालिता नित्य। तुमचा स्नेह जाणून दैत्ये।

पाठविले तुम्हासी बोधावया।।७।। इंद्र म्हणे हे अमरावतीचे राज्य। करितो शिव कृपेकरूनी मीच। शिवाज्ञेने झालो युद्धास सज्ज। शिक्षा देईल शिव मज।।८।। मग इंद्र म्हणे ऐका एक विचार। तुम्हीच जावे शिवापासी सत्वर। तुम्हीच बोधून तो त्रिपुरहर। सौम्य करावे बुद्धिवंता।।९।। मग इंद्र आणि शरभानन। आले शिवसभेसी त्वरे करुन। दैत्य मतिमान शिवास वंदून। कर जोडून शिवस्तुती करी ।।१०।। मग म्हणे आला कैलास सोडून। का आलसी युद्धालागून। याचे ऐसे कोणते कारण। न दिसे मज स्वामीया।।११।। शिव म्हणे शरभानना लागून। अरे मल्ल महाखळ दुर्जन। तेणे त्रासिले गाई-ब्राह्मण। शिक्षा लावीन मी त्यासी।।१२।। आलासी तू शिष्टाईसी। जाऊनी सांग मल्लासी। प्राण वाचावा विचार असे चित्ती। तरी रसातळी जाऊनी रहावे।।१३।। जरी तुज हे नसे मान्य। तरी यावे युद्धास ससैन्य। हा त्रिशूळ समरी घेईल प्राण। याती संशय नसेची।।१४।। शरभानन येई परतूनी। सांगे वृत्तान्त मल्ला लागूनी। म्हणे बोधिले मी इंद्रालागून। परी शिवाचा दुराग्रह बहु असे।।१५।। ऐकोनी मल्ल बहु हास्य करी। म्हणे सुबुद्धी विचार करी। इंद्रासी जो जीवे रणी मारी। ऐसा दैत्येंद्र योजावा।।१६।। प्रधाने योजिले निर्जरध्वंसि यासी। मल्ले सभेत बोलावूनी त्यासी। वस्त्रालंकारे बहु सन्मानीले त्यासी। निघाला निर्जरध्वंसी युद्धास ।।१७।। देवेंद्रे जाणले सर्व वृत्त। त्वरेने आला तो शिवसभेत। म्हणे परमखळ हा दैत्य। युद्धी परम कुशल अन् मायावी।।१८।। शिव मग म्हणे वज्रपाणी। तू जाऊनी समरांगणी। पापी दैत्यासी युद्ध करूनी। जीवे मारुन टाकीजे।।१९।। इंद्र म्हणे मज आज्ञा

प्रमाण। परी रणस्तंभातळी यंत्र ठेवून। दैत्ये टाकीली रणभूमी भारून। यासी काही उपाय करावा।।२०।। शिवे त्वरे पाठविला कालाग्निरुद्र। स्तंभ रक्षक मारीले त्वरीत। स्तंभ उपटूनी यंत्र काढून।आणिले त्वरे शिवापाशी।।२१।। इंद्र शिवास करी नमन। तीन प्रदक्षिणा शिवासी घालून। रणभूमीस आला तो ससैन्य। दोन्ही सैन्ये मिळाली।।२२।। रथासी मग रथ भीडले। एकमेकासवे युद्ध करू लागले। सारथी सारथियासी ते वेळे। युद्ध दारूण जाहले।।२३।। इंद्रे धनुष्य टणत्कारुन। दैत्य सैन्य मारीले दारुण। ते निर्जरध्वंसीने अवलोकून। रथ लोटी तो इंद्रावरी।।२४।। धनुष्यास बाण लावून। शतबाणी तोडीला पाकशासन। इंद्र ते बाण खड्गे करून। तोडीता झाला निजबळे।।२५।। हे पाहून दैत्य क्षोभला। तीक्ष्ण बाण घेई ते वेळा। हृदयी विंधून नगरीला। मूर्च्छित केले क्षणमात्रे।।२६।। दैत्य परम वीर्यवान। त्वरेने करी शरसंधान। सकळ देव सैन्य खिळोन । बाणे करूनी टाकिले त्याने।।२७।। इंद्र बसे मूर्च्छा सावरून। तव दिसतसे दैवसैन्य म्लान। मग इंद्राने अग्निअस्त्र जपून। दैत्यावरी टाकीले ।।२८।। निर्जरध्वंसीने टाकीले पर्जन्यास्त्र। शस्त्रास्त्री युद्ध बहुत। तोच ज्वालामुख पापराशी दैत्य। धावुनी आला युद्धासी।।२९।। अग्नि, सूर्य, चंद्र, नक्षत्रे आली। युद्ध घनघोर करु लागली । वरुणही धावला रणामाजी। अमरांतके पाश तोडीला त्याचा।।३०।। इंद्र धनुष्य घेऊनी करी। हृदयी स्मरे त्रिपुरारी। पंचशरी तो निर्जरारी। हृदयामाजी विंधीला तेणे।।३१।। इंद्रासी झाला जय प्राप्त। परी नसे

संतोष त्याचे मनात। देव सैन्य रणी निमाले बहुत। शिवासी सांगे तो वर्तमान।।३२।। तेव्हा शिवे कृपाळू होऊन। अमृत संजीवनी मंत्र जपोन। रणी निमालेले देव संपूर्ण । ते उठविले क्षणमात्रे ।।३३।। हर्ष होऊनी उमापती। स्वर्गातूनी देव पुष्पे वर्षती। मार्तंडावरी भंडार उधळती। नैवेद्यादि अर्पिती उपचार।।३४।। तोषविती सर्व भैरवालागून। येळकोट येळकोटी शब्दे करून। गर्जती एकत्र उल्हासे करून। जयवाद्ये वाजती बहुत।।३५।। मल्लासूर चिंतातूर झाला। म्हणे देवांस जय झाला। प्रधान म्हणे मल्लासूराला। युद्धी जय पराजय होतसे।।३६।। तेणे मणि दैत्य बोलावून। मग तिघे एकत्र बैसोन। विचार करती युद्धालागून। मणि म्हणे मी जाईन रणी।।३७।। मल्ल सभेत येऊन बैसला। बोलाविले सकळ सैनिकांना। म्हणे माझा रथ आणा पहिला। जाईन मीच युद्धासी।।३८।। सेनापती खड्‌गदंष्ट्र विख्यात। म्हणे मी जाईन युद्धास। देव उत्साह करती बहुत। त्यांसी मारीन मी रणी ।।३९।। तेणे मल्ल संतोषला मनी। त्याची बहुस्तुती करूनी। गौरविले त्यास वस्त्रालंकारी। तांबूल देऊनी पाठवीला।।४०।। वृत्त ऐकून इंद्र आला शिवसभेत। म्हणे मल्ल सेनापती येई युद्धास। हा दैत्य परम पापराशी असत। शोधूनी मारी गो ब्राह्मणांसी।।४१।। ऐकोन हासोन बोले शूलपाणी। असावे निर्भय वज्रपाणी। हा षडानन जाऊनी रणी। विजयी होऊन येईल की।।४२।। मार्तंड भैरवाची आज्ञा ऐकून। निघाला षडानन सैन्य घेऊन। मयुरावर स्वये केले आरोहण। ऋषी त्यासी आशीर्वाद देती।।४३।। दोन्ही सैन्यांची समदृष्टी। होता पाहुनी मग धूर्जटी।भस्म मंत्रुनी एक मुष्टी। दैत्य सैन्यावरी टाकतसे

।।४४।। या भस्मप्रभावे करून। दैत्य हृदयी भय संचरून। युद्ध उत्साह गेला भंगून। क्षणामाजी तये वेळी।।४५।। दैत्य सेनापती प्रतापवंत। रणपंडित असे विख्यात। म्हणे सकळ कुमार बाळें बहुत। हे मजसी काय युद्ध करती।।४६।। दैत्य सेनापती हासोन बोलतसे। तुम्ही युद्धासी आला कैसे। मजतरी सैन्याची गरज नसे। एकटाच मी युद्ध करीन।।४७।। तुझा बाप बहुत पिसा। मुलास तुला पाठवी युद्धाया। लज्जा कशी नाही मनी त्याच्या। तुज मी प्राणदान देतसे।।४८।। जाऊन सांग तुझे बापासी। म्हणे इंद्रास पाठवा युद्धासी। नाही तरी तुम्ही जाऊन स्वत:ची। युद्ध करावे निजबळे।।४९।। षण्मुख मनी अती कोपला। म्हणे मी तुझा अंतक पामरा। शर मजसी केवळ तृणभारा। सावध होऊनी युद्ध करी।।५०।। मग षण्मुखे त्वरे करूनी। असिदंष्ट्र विंधिला सहस्त्रबाणी। दैत्य बाण येता क्षणी। खड्गे करुनी तो तोडीतसे।।५१।। षण्मुखे दैत्याचा सारथी मारिला। ध्वज त्याचा तोडोनी टाकीला। दैत्यसैन्यी थोर आकांत झाला। भय सुटले दैत्यसैन्यासी।।५२।। सैन्य भंगले पाहून असिदंष्ट्रवीर। युद्धकळा जो जाणतो थोर। धैर्याचा मेरू तो खरोखर। तेणे संहारास्त्र निवारले।।५३।। बाणांचा वर्षाव करी स्वामीवरी। मयूर नभी उडवी तारकारी। मयूर आकाशी उडता पाहूनी। कंठ विंधिला तेणे मयूराचा।।५४।।स्वामी दुजा मयुरावर बैसला। दैत्य बाणेकरूनी त्रासिला। दैत्य सेनापती मनी घाबरला। न सूचे काहीच तयासी ।।५५।। मग निर्वाणीचा बाण काढून। लाविला धनुष्यास त्वरे करून। स्वामी विंधिला न लागता क्षण। मूर्च्छा आली स्वामीसी।।५६।। मुहूर्तांतरी सावध होई तारकारी। तव सैन्य गेले दिगंतरी।

स्वामी विचार करी मनी। याचा वध कैसा करावा।।५७।। तेणे अस्त्रे शक्ती अभिमंत्रिली। शतघंटा विलंबिती आगळी। हृदयी आठवूनी चंद्रमौळी। निजबळे दैत्यावरी टाकीली।।५८।। हातीची शक्ती गेली सुटोन। दैत्य हृदयावरी आदळली जाऊन। दैत्यहृदय गेले विदारून। प्राण गेला दैत्याचा।।५९।। स्वामीने पाहीले आपुले सैन्य। समग्र निमाले युद्ध करून। मग अमृत संजीवनी मंत्र जपून। देवसैन्य समग्र उठविले।।६०।। स्वामी जयवंत जाहला। सर्व देवांनी जयजयकार केला। मयुरावरी स्वामी जाऊन बैसला। मिरवत आला शिवसभेत।।६१।। दैत्य सैन्य समस्त पळाले। मल्लास सर्व वर्तमान कळले। मल्ल शोक करी आक्रोशे। प्रधान त्यास समजावी।।६२।। मल्ल म्हणे गा सुमती। सेनापती योजावा शीघ्रगती। जो असेल तुमच्या चित्ती। मुख्य दैत्य सामर्थ्यसंपन्न।।६३।। मल्ल आज्ञे उल्कामुख निघाला। आज्ञा देई सकळ सैन्याला। म्हण चला रे जाऊ रणभूमीला। संग्राम करु दुर्धर घोर।।६४।। उल्कामुख नावे घाबरला पाकशासन। शिवाप्रती येऊन करी नमन। म्हणे उल्कामुख दैत्य पापी परम। युद्धामध्ये परम दुष्ट।।६५।। शिव गजाननास आज्ञा करी। तू जाऊनी वधावे उल्कामुखास ।।६६।। गणेशे आपले सैन्य सज्ज करून। भंडार सत्वर उधळून। करी देवसैन्य निर्विघ्न। मुखे उच्चारिती जयजयकार।।६७।। उल्कामुख बोले गणपतीसी। तू कैसा आलासी युद्धासी। बाप तुझा अति तामसी। मुलास पाठवी युद्धालागून।।६८।। गणेश वदे पापमती दुर्जना। शिवनिंदा करिसी दुर्जना। शिव ब्रह्मांडगोलाची रचना। क्षणामाजी करीतसे।।६९।। ऐसे गणपतीचे उत्तर ऐकोनी। दैत्य

कोपला जैसा प्रळयाग्नी। धनुष्य घेऊनी शतबाणी। गणपती विंधिला सत्वर।।७०।।गणपतीने अति त्वरे करून। बाण तोडीले न लागता क्षण। गणपतीचे युद्धलाघव पाहून। उल्कामुख हृदय गेले भंगून ।।७१।। मग दैत्ये वीस बाण काढीले। तेणे गणाधीशासी विंधिले। रथाचा आख तोडिला ते वेळे। विरथी झाला गजानन।।७२।। गणेशे घेऊनी धनुष्यबाण। सातबाणी विंधिला दैत्यदुर्जन। रथ दैत्याचा केला पूर्ण चूर्ण। दैत्य पडलासे उलथोन।।७३।। ऐसे उभय बहु करती युद्ध। गणेश मस्तकी गदा घाली दैत्य। गणेशे वज्र, मुष्टी वळुनी सत्वर। दैत्य ताडिला हृदयावर।।७४।। दंत प्रहारे करूनी सत्वर। दैत्य उलथोनी पाडीला धरणीवर। विक्राळ पसरले त्याचे शरीर। गणेशे वधिला उल्कामुख दैत्य।।७५।। देव सैन्य जे रणी निमाले। ते गणपतीने संपूर्ण उठविले। जयवाद्ये वाजती ते वेळे। मिरवत आला गणेश शिवसभेत।।७६।। देवसैन्यीं उत्साह भारी। आनंद करिती शिबिरागारी। सकल म्हणती जय जय त्रिपुरारी। साह्यकारी तू झालासी।।७७।। ऐकोनी शोक करी मल्ल अती। म्हणे प्रतापहीन झालो आम्ही। उल्कामुखे दैत्यही पडला रणी। काय करू न सूचे मजसी।।७८।। प्रधान म्हणे युद्ध हाव न सोडीजे। संग्रामी शत्रुसी जिंकीजे। कीर्ती हेची धन मानीजे। तुम्हासी काय सांगावे दैत्येंद्रा।।७९।। तेव्हा कुंतीलोमा दैत्य प्रचंड। हाती घेऊनी विशाल दंड। म्हणे दैत्येश्वरा राहे स्वस्थ। रणी देव मी मारिन समस्त।।८०।। कुंतिलोमा आपुले शिबीरी येऊन। सकल सैनिकांसी आज्ञा करून।

म्हणे आपापली शस्त्रे घेऊन। युद्धालागी चलावे आता।।८१।। ऐकोनी वृत्त इंद्र शिवसभेस आला। म्हणे कुंतिलोमा रणी आला। या दैत्याने जिंकले बहुवेळा। यासी युद्धामाजी कोण मारील।।८२।। मार्तंड भैरव बोले वज्रधारी। दैत्याचे भय तुज झाले भारी। हा दैत्य मशक असे निर्धारी। याचा वध जयनंदी करेल।।८३।। शिवाज्ञा वंदुनी शिरी। जयनंदी सैन्य सज्ज करी। म्हणे रणी मी कुंतिलोमा मारी। जयनंदी रणी आला असे।।८४।। कुंतिलोमा आला निजबळे करून। म्हणे हा पंचवक्त्र असे कोण। म्हणे तूची महेश काय म्हणून। नव्हे हा तर शिव किंकर।।८५।। अरे जरी मी तुज रणी जिंकीले। तरी मम पुरुषार्थासी उणे आले। फक्त एका शिवगणास मारिले। म्हणूनी वीर मज हसती।।८६।। अरे युद्धास पाठवी शूलपाणी। त्यासी युद्ध करीन समरांगणी। जयनंदी क्रोध पावला हे एकोनी। म्हणे छेदीन तव जिव्हेसी।।८७।। जयनंदी म्हणे सावध होई। माझे बाण साही निर्धारी। दैत्य जयनंदीस म्हणे ऐकोनी। मी तर प्रत्यक्ष कृतांत असे।।८८।। जयनंदी मुष्टीत घेई धनुष्य। काढिले तीक्ष्ण बाण विषपाजीत। बाणे हृदयी विद्‌ध केला दैत्य। परी अमृतकृपी दैत्य हृदयी असे।।८९।। औषधाचे असे वीर्य बहुत। वक्ष:स्थळ झाले पूर्ववत। दैत्ये चाप घेतले त्वरीत। जयनंदी वेधिला दिव्यशरे।।९०।। जयनंदीने लाघवे करून। बाण तोडीले खड्‌गे करुन। ते पाहून दैत्य दुर्जने। शतबाणी जयनंदी विंधिला।।९१।। मग दैत्ये मोहनास्त्र चिंतून। बाण योजिलें न लागता क्षण। जयनंदीने महेश्वरी

अस्त्र मंत्रून। दैत्य विंधिला निजबळे।।९२।। अस्त्राचा असे प्रभाव भारी। दैत्यास्त्र गिळीले वरचे वरी। दैत्य भेदिला पंचशरी। कंठनाळ त्याचा छेदिला।।९३।। दैत्य निचेष्टित धरणी पडला। दैत्यसैन्यी हाहाकार झाला। म्हणती कुंतिलोमा रणी पडला। झाले आश्चर्य सर्वांसी।।९४।। तेव्हा कुंतिलोमा होऊनी सावध। विंधी जयनंदी मारुन द्वादशबाण। ते बाण असती परम तीक्ष्ण। मूर्च्छा आली जयनंदीसी।।९५।। क्षणात जयनंदी मूर्च्छा सावरून। हृदयी स्मरे पंचवदन। म्हणे जयजय त्रिपुर सूदन। दैत्य हा निर्दाळी सत्वर।।९६।। जयनंदीने धनुष्य घेऊन सत्वर। दिव्य घेतले पाच शर। पाशुपत अस्त्रे मंत्रुनी क्रुर। दैत्य हृदयी विंधिला।।९७।। कुंतिलोमा उलथोनी पडला मही। नेत्र फिरवूनी पाहे लवलाही। क्षणमात्रे तो प्राण सोडी। जयनंदीस यश आले।।९८।। मंत्रसामर्थ्ये उठविले देव सैन्य। जयनंदी मग रथी बैसोन। शिवसभेस आला त्वरे करुन। शिव-मृडानीस तो नमन करी।।९९।। हा वृत्तांत मल्लास समजला। कुंतिलोमा रणी निमाला। ऐकताच तो धरणी पडला। वक्षस्थळ बडवून शोक करी।।१००।।

श्री मल्हारीमार्तंड चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरमार्पणमस्तु ।

हा अध्याय करीता पठण। होई साऱ्या शत्रुंचे दमन। श्रद्धा ठेऊन दृढ मनी। मार्तंडाचे दर्शन होईल स्वप्नी। प्रचिती मिळूनी समाधानी। संतोष वाटेल सकलांना।

।। श्री ।।

# ।। आरोग्य अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः।श्री मल्हारीमार्तंडाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

मल्ल दैत्येंद्र माजला फार। त्यांनी छळिले देव ब्राह्मण फार। तयाचा नाश करण्याकारण। सदाशिव सज्ज जाहला।।१।। मल्लाने पाठविले विविध सेनापती। शिव आपुले पुत्र-गण पाठवी। ऐसे तुंबळ युद्ध जाहले अती। दैत्यसेना पराभूत होतसे ।।२।। रणी धीर वीर पडता पाहूनी। मल्ल दैत्येंद्र चिंताग्रस्त होई मनी। ते समयी बंधु दैत्य सांगे येऊनी। मीच जाईन युद्धालागुनी।।३।। आता त्यांचे युद्ध कैसे रणी। तयाची वर्णावया कहाणी। द्यावे सामर्थ्य भक्त गणेशालागुनी। विनवणी चरणी स्वामी समर्था।।४।। सांगतो आता आपुल्याची कृपे। मल्ल बंधु मणिस म्हणे हे बरे नव्हे। तू सान बंधु तुज रणी पाठवूनी। मी सदनी स्वस्थ कैसे बैसू ?।।५।। ऐकोनी मणि म्हणे मल्ल दैत्यासी। आज मीच जाईन संग्रामासी। रणी मारीन मी इंद्रासी। इंद्ररक्ते करीन मी पितृतर्पण।।६।। तयाचा दृढ निग्रह पाहून। मल्ल अधोमुख

बोले वचन। तू सान बंधू तुज वाचून। प्राण माझा व्याकुळ होतसे।।७।। मणि म्हणे कोण बंधु अन् सुहृद। कोणाचे मातापिता गणगोत। सर्व मायिक जाणसी सत्य। वृथा शोकसागरी बुडू नको।।८।। मणि मग बोले निर्वाणवचन। मी सदाशिवासी रणी मारीन। न जरी घडे काळ सत्ते करून। तरी मी प्राणदान करीन त्यासी।।९।। ऐसे मणि कर जोडून बोलला। सेना नायकी जयजयकार केला। म्हणती दैत्य रणी मारु शिवाला। अमर सर्व निर्दाळू आम्ही।।१०।। मणि मल्लासुर स्त्रियांसी वंदून। म्हणे आजवरी केले पालन। आता लोभ असावा असे म्हणून। चरणी मस्तक ठेवीतसे।।११।। मल्लासूर स्त्रिया बोलती सुवचन। म्हणती यावे विजयी होऊन। समस्त शत्रुवीर निर्दालून। आनंद आम्हाते करावा।।१२।। ऐकून मणि उल्हास पावला। झडकरी अंत:पुराबाहेर आला। सारथी घेऊनी आला रथाला। मणि रथी जाऊनी बैसला।।१३।। सहस्त्र छत्रे नीलवर्ण उन्नत। वरी रत्न कळस विराजत। मणि मस्तकी शोभती बहुत। प्रतापवंत मणि रणी निघाला।।१४।। मणि दैत्य असे क्रोध भरीत। नेत्र तयाचे बहुत आरक्त। महानायक बळे हाक देत। प्रलयकाळी मेघ जैसा।।१५।। म्हणे अरे भ्याडा पशुपती। सामोरा येई युद्धाप्रती। नातर करी पलायन निश्चिती। एकची प्रतिध्वनी उठला असे।।१६।। ऐकोनी इंद्र भय पावला। सत्वर तो शिवापाशी आला। म्हणे रणी मणि दैत्य आला। हा दैत्य शूर कपटी दारुण।।१७।। शिव तयासी बोले हासून। तू व्हावे निश्चिंत निर्भय जाण। हा दैत्य क्षुद्र

याचे हनन। करीन मीच देवेंद्रा।।१८।। वीरभद्र उभा राही कर जोडून। म्हणे आज्ञा द्या मजलागून। मी रणभूमीसी जाऊन। या दैत्या वधीन निजबळे।।१९।। शिव म्हणे हा परमखळ पापमती। याने तोषविला सत्य लोकाधिपती। त्याचे वरदेकरून न गणिती। महाउन्मत्त निशाचर।।२०।। यासी युद्ध मीच करीन। शिव आज्ञा करी विरोचनास। म्हणे झडकरी आणा येथ नंदीस। विरोचने नंदी आणीला ।।२१।। सिंहाचे पृष्ठावरी पाद देऊन। शिवाने नंदीवर केले आरोहन। इंद्रादिदेव दिक्पती सेना घेऊन। अग्रभागी सर्व उभे राहीले।।२२।। सभोवती झाली गणांची दाटी। तैसीच झाली अमरांची मिठी। उग्र मातरा झोटिंग जेठी। रणभूमीस सर्वच धावती।।२३।। विष्णु गरुडावरी बैसोन। तैसाच पाही चतुरानन। समागमें निजसैन्य घेऊन। रणभूमीस सर्व चालले।।२४।। देवसैन्य पाहुनी मणि हास्य करी। म्हणे हा शिव भिकारी। आधी वधीन हा त्रिपुरारी। हाच संकल्प आमुचा असे।।२५।। शिव प्रथम मारुन नंतरी। वधीन रणी मी वृत्रारी। म्हणूनी रथ लोटला ते अवसरी। शिवावरी बळे करून।।२६।। मणि आपुल्या सैन्यास आज्ञा करी। कौतुक पहा क्षणा भीतरी। हा शिव मजसी युद्ध करी। ते तुम्ही नयनी अवलोकीजे।।२७।। शिवा तू भिक्षुक परयांचा करसी। काय म्हणूनी आला युद्धासी। अजुनही जा तू कैलासी। आपुले जीवित्व रक्षण करी।।२८।।अरे हा इंद्र शतमूर्ख म्हैसा। याचे साह्यासी आलासी कैसा। मल्लासुराचा प्रताप सुरेशा। तुज अद्यापि ठाऊक नसे।।२९।। म्हणे तुझे आमुचे वैर नसे। इंद्र आमुचा दायाद असे। त्याचे आमुचे बरे सरसे। कदा काळीही नसेची।।३०।।

आमुचे शत्रुचे बोली लागुन। आम्हीसी वैर करणे निःकारण। तू भिकारी वाचवी आपुला प्राण। करी विचार निजमानसी।।३१।। जरी हे न रुचे तुजलागुन। तरी दे सैन्याचा आश्रय सोडून। झडकरी पादचारी होऊन। राही उभा मजसमोरी।।३२।। ऐसा दुष्टोत्तरे शंभु ताडीला। ते ऐकून वीरभद्र कोपला। म्हणे अरे शिवानिंदका खळा। क्षणामाजी तुज मारीन मी।।३३।। अरे तुझा मृत्यु समीप आला। म्हणूनी तुज कंठ फुटला। उगाची बोलसी तू बरळा। दुष्टा तू शिवप्रताप नेणसी।।३४।। शिव बोले वीरभद्रासी। तू चिंता न करी मानसी। दैत्याचा वध करीन निश्चयेसी। स्वस्थ तुवा असावे।।३५।। नंदी सोडूनी शिव झाला पादचारी। म्हणे सावध होई रे युद्धासी। शिवे बधीर केले दाही दिशांसी। सिंह नादे करूनीया।।३६।। मणि बोले बाहू पिटून। म्हणे अगोदर करी तू संधान। मी तयाचे करीन निवारण। मग माझे संधान अवलोकिजे।।३७।। सदाशिवे लोहार्गळा घेऊन। आकाशी दिधली भिरकावून। दैत्य मशक करावा चूर्ण। म्हणून संधान केले असे।।३८।। ती गदा येता दैत्ये पाहोन। ढालेवर घेतली झेलून। दैत्य मग हासे गदगदून। म्हणे बळ तुझे समजले।।३९।। तारुण्यकाळी युद्ध तू केले असेल। ते काळी तुज असेल बळ। परी आला असे वृद्धापकाळ। युद्ध करणे न उचित तुज ।।४०।। शिवे काढिला भात्यातून बाण। बाणाचे वीर्य प्रसवी सहस्त्रावधी बाण। बाण येता पाहूनी मणिदैत्य। खड्गे करुनी तोडीतसे।।४१।। मग दैत्य बोले गर्जोन। तुझी दोन संधाने क्रूर। ती मी निजबळे केली व्यर्थ। आता साहे माझे बाण।।४२।। मणि धनुष्य मुष्टीत घेऊन। धगधगीत बाण

त्यास लावून। शिवाचे वक्ष:स्थळ लक्षून। झाला सोडता ते काळी।।४३।। ते बाण सहस्त्रावधी प्रसवती। बाण येता पाहून पशुपती। हुंकारे करून त्वरीत गती। भस्म केले क्षणार्धात।।४४।। दैत्य क्रोधे संतापला। खड्‌ग घेऊनी शिवावर धाविला। शिवे चंद्रास्य तलवारीने ते वेळा। छेदीले मस्तक दैत्याचे।।४५।। परी मायावी दैत्य धरी शरभ रुप। शिवभुजेसी दंश करीत। शिवे शरभासी मारीले खड्‌ग। शरभ अश्वरुप झाला।।४६।। शिवे धनुष्यास बाण लावून। टाकली अश्वग्रीवा छेदून। दिग्गज झाला अश्व पाडून। शिवे गजाचे मस्तक तोडीले।।४७।। दैत्य मग पूर्वरुप धरीतसे। जाऊनी अश्वावरी बैसे। शिवास माराया धावतसे। चर्मखड्‌ग घेऊनी हाती।।४८।। शिवे सोडीले अग्निअस्त्र। दैत्य पापमती सोडी पर्जन्यास्त्र। शिवे सोडीतसे वायु अस्त्र। दैत्याने सोडीले पन्नगास्त्र।।४९।। मग शिवे गरुडास्त्र सोडीले। सर्प संपूर्ण तेण भक्षिले। दैत्ये मग ब्रह्मास्त्र सोडीले। शिवे रुद्रास्त्र सोडून शांतवले ।।५०।। मग दैत्ये कोपे बाण काढून। सोडी शिवाचे अवयव लक्षुन। विंधिले शिवासी बाणे करून। देत्य मणि मनी संतोषला।।५१।। दैत्य शिवाकडे पाहे अवलोकून। शिव व्यापिला बाणे करून। मग निर्वाणीची ब्रह्मशक्ती घेऊन। शिवावरी तो टाकतसे।।५२।। शिवे नैशचूर्ण सर्वांगी उधळले। तेणे सर्व बाण गळून पडले। क्रोधे शक्तीकडे पाहीले। ती भस्म झाली क्षणमात्रे।।५३।। पाहुनी हे दैत्य आश्चर्य करीत। काय करावे असे म्हणे मनात। मग हाती घेऊन चर्च खड्‌ग। शिवावरी तो धावला।।५४।।

शिव मनी म्हणे दैत्य परमशूर। परी आता न करावा उशीर। त्रिशूल पाशुपतास्त्र मंत्रून त्रिपुरहर। दैत्यावरी त्या सोडीतसे।।५५।। त्रिशूल आदळला दैत्य हृदयी। दैत्य पडला उलथोनी। शिवे ठेविला पाद दैत्य मस्तकी। तेणे दैत्य पावन झाला।।५६।। चरणस्पर्श होता दैत्यासी। सुमती उत्पन्न झाली त्यासी। अष्टभावे प्रेमाश्रु नेत्री वाहती। परम भक्तिमान झाला दैत्य।।५७।। दैत्य म्हणे मग शिवाला। तुमचा महिमा मी न जाणला। दुष्ट योनीत जन्म घेतला। तेणे झाला हा बुद्धिभ्रम।।५८।। आता माझे प्राण व्याकुळ होती। तुझे स्तवन करण्या दे मती। करावी कृपा जगत्पती। या दासावरी दीन दयाळा।।५९।। दैत्य स्तवनी उल्हास भारी। हर्ष न समाये अंतरी। दुर्गती पळूनी गेली दूरी। कृपेस पात्र तो झालासे।।६०।। शिव मग म्हणे दैत्यासी। तोषविले परम आम्हासी। मागुन घ्यावे आपण वरासी। मागाल ते मी देईन।।६१।। दैत्य म्हणे जर वर देसी मजसी। मागतो मी परोपकारासी। मी केलेले स्तोत्र पठितो त्यासी। वरप्रद व्हावे आपण।।६२।। शिवे मस्तकीचा चरण काढीला। मणिने शिव अवलोकीला। हृदयामाजी साठवी शिवरुपाला। प्राण सोडीला क्षणार्धात।।६३।। शिवासी ऐसा विजय झाला। वृत्त समजले मल्लदैत्याला। मल्ल हृदय पिटू लागला। करी आक्रोश बंधुसाठी।।६४।। प्रधान शांतवी मल्ल दैत्यासी। दैत्य म्हणे त्वरा करा युद्धाची। जाऊ रणी शत्रु मारावयासी। रणी सर्व अमर मारु।।६५।। प्रधाने बोलाविले सेनापतीसी। युद्ध करुन संतोषवावे दैत्यासी। रत्नराशी घातल्या न्यावयासी। इच्छा असेल ते न्यावे।।६६।। दैत्य म्हणे विलंब काही नसे। आमुचे सैन्य सिद्ध असे।

चिंता चित्ती न वाहे। रणी शत्रू मारु नि:शेष।।६७।। प्रधाने बोलाविला सुरेंद्रदर्पदलन। तो राक्षसांचा स्वामी दारूण। क्रोधमूर्ती तो धावला ऐकोन। मल्लासूर हर्ष पावला मनी।।६८।। प्रधान बोले सुरेंद्रदर्पदलनासी। दैत्येंद्र सेनापतित्व देई तुम्हासी। रणी करोनी प्रबळ युद्धासी। संतोषवावे दैत्येंद्रासी।।६९।। सुरेंद्रदर्पदलन निघाला सैन्य घेऊन। मल्लासुरही निघाला ससैन्य। दुंदुभीनादे दिशा गेल्या भरून। हेर देवेंद्रास वृत्त सांगती।।७०।। हासुनी शिव बोले इंद्रासी। म्हणे मणिने तोषविले मजसी। आता वाचवावे मल्लासूरासी। ऐसी इच्छा मनी असे।।७१।। मघवा म्हणे ऋषीश्वरांसी। यत्न केला मारावे मल्लासूरासी। परी शिव वाचवी मल्लासी। तुमचा प्रयत्न व्यर्थ गेला।।७२।। ऋषी मग प्रार्थिती शिवासी। रणी मारावे मल्लदैत्यासी। करावे सफल आमुच्या इच्छेसी। हीच विनंती तव चरणी।।७३।। ऋषींचे मनोगत ऐकून। म्हणे मल्लास पाठवितो सांगून। आज्ञा अव्हेरिता न लागता क्षण। सत्वर वधीन निश्चयेसी।।७४।। शिव विष्णूस पाठवी मल्लाप्रती। मल्लासी आज्ञा सांगा निश्चिती। उरले दैत्य घेऊनी त्वरीत गती। रसातळी जाऊन राहीजे।।७५।। जरी हे त्यासी न मानवेल। तरी तो निज जीवास मुकेल। मल्ल जर युद्धाची हाव धरील। तरी त्याचा मृत्यु निश्चित असे।।७६।। दूत सांगती मल्लासुरासी। म्हणे शिष्टाई करावयासी। विष्णु आला असे भेटीसी। मल्लास बहु आनंद झाला।।७७।। विष्णुस सिंहासनी बैसवून। षोडशोपचारी मल्ल करी पूजन। हर्षे दैत्य विचार करी मनातून। चक्रपाणी

साहय झाला मजसी।।७८।। विष्णू म्हणती मल्ला लागुन। तुज अहंकार रोग झाला दारूण। तेणे तुझा बंधु आप्त स्वजन। समग्र निमाले रणांगणी।।७९।। अरे तू जाणसी शूलपाणीसी। रहावे सदा नमून तयासी। वैर पावता निधन पावसी। सत्य हेच जाण दैत्येंद्रा।।८०।। तू गो-ब्राह्मणांस त्रासिले। हे संपूर्ण भैरवास जाणवले। म्हणोनी कैलासाहून येणे केले। तुझा नाश करावया।।८१।। ऐकोनी विष्णूचे भाषण। मल्लदैत्य क्रोधे खवळला हुताशन। म्हणे पूर्वजे केले तुमचे पूजन। म्हणोनी बोल सहन केले।।८२।। आमुची विनंती तुम्हा लागून। शिवसैन्यी न रहावे आपण। शिवास सैन्यासह रणी मारीन। मम युद्ध कौशल्य पहा निर्धारी।।८३।। विष्णु म्हणे तुजसी काय झाले। कैसे तुज मृत्युने ग्रासीले। अरे स्वहीत स्वीकारी आपुले। मम आज्ञे करूनीया।।८४।। मल्ल म्हणे मी भीरू नसे रमापती। पहा रणी मारीन पशुपती। याची न कीजे भ्रांती। प्रतिज्ञा करून मी बोलतसे।।८५।। मल्लाचे ऐसे ऐकून उत्तर। त्वरीत निघाले शारंगधर। त्यांसी विनंती करी मल्लासूर। अंत:काळी मज दर्शन द्यावे।।८६।। पुढे मल्ल बोले प्रधानासी। कठीण यश येणे आम्हासी। तरी घेऊन सकळ स्त्रीयांसी। कळेल तिकडे नेई का।।८७।। प्रधान बोले जोडूनी कर। म्हण आम्हीही करू प्राण त्याग। परी यासी असे उपाय एक। सांगितो मी तुम्हासी।।८८।। मम बंधुपुत्र असे सदनी। उल्लुक नामें प्रतापरणी। आणितो तयासी बोलावूनी। हे काम तयासी देईजे।।८९।। मल्ले सांगितले मुख्य भार्येस। आम्ही गमन करतो संग्रामास। शत्रू मारून येऊ निश्चित। परी सत्य तू जाण भामिनी।।९०।।

जावे पित्याघरी स्त्रीयांस घेऊन। सदनी रहावे आनंदे करून। रक्षणास उल्लून प्रधान। येत असे प्राणवल्लभे।।९१।। ती म्हणे मज स्वामी आज्ञा प्रमाण। नगरी जाते पुत्र घेऊन। हे ऐकोनी मल्ल हर्षे करून। आलिंगन देई स्वकांतेसी।।९२।। मल्लासूरे उल्लुकास बोलावून। स्वस्त्रीचे अंकी घाले आपण। म्हणे हा पुत्र तुझा सर्वांहून। श्रेष्ठ असे मानी का।।९३।। राणीवशांत येऊनी प्रधानपुत्र। मल्लाचे घेऊनी सुत। स्त्रीया स्नुषांसह कन्यापौत्र। नगरामाजी प्रवेशले।।९४।। शिबीरे नेली उपटून। तळ शुद्ध ठेविला करून। उरले जे सकळ सैन्य। त्यांसी मल्ल सांगतसे।।९५।। मी रणी प्राणदानास उद्युक्त। तुमचे कुटुंबात गुंतले चित्त। ज्यासी असे प्राणभय निश्चित। जावे त्याने नगराप्रती।।९६।। ऐसा मल्लासुराचा शब्द ऐकून। म्हणे काय बोलसी भ्रांत होऊन। रणी आम्ही वधु त्रिनयन। संशय चित्ती न ठेवीजे।।९७।। आमुचा शब्द असे दैत्येंद्रा। तुझिये कार्यास सिद्धसदा। भय पावोनी आम्ही करु मर्यादा। तरी आमुच्या पूर्वजा उणे असे।।९८।। ऐसे निश्चित बोल बोलून। मल्लास संतोषविती जाण। आपुलाले वाहनी आरुढ होऊन। दैत्य सैन्य रणभूमीस निघाले।।९९।।कुटुंबाचा सस्नेह निरोप घेऊन। मल्लासूर निघाला रथी बैसून। तेज तयाचे विस्तारले गहन। अंत:काळी दीप जैसा ।।१००।।

श्री मल्हारीमार्तंड चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

हा अध्याय करीता पठण। शत्रुलाही करी मोहन। होईल दरिद्र्याचे सकल उच्चाटन। सर्व ऋणातून करी भक्ताचे मोचन। मनोभावे राज्यपद इच्छिले ज्याचेनी। वशीभूत करूनी जनांसी प्राप्त होईल त्यासी।

।। श्री ।।

# ।। पापमोचन अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री मल्हारीमार्तंडाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

मल्ल निघाला रणभूमीप्रती। अग्रभागी कुंजरांच्या पंक्ती। तैसेची अश्व शोभती। मंगळतुरे वाजती दैत्यासमोरी।।१।। उष्ट्रस्वार अग्रभागी धावती। जयवाद्ये अपार वाजती। गजस्कंधी महाभेरी गर्जती। मोदे मिरवीत मल्ल निघाला।।२।। मल्ल निघाला शिवासवे युद्धासी। तयांचे युद्ध वर्णावयासी। द्यावी मती भक्त गणेशासी। दयाळू कृपाळू स्वामिया।।३।। मल्ल सांगे सुरेंद्रदर्पदलनाप्रती। व्यूह थोर रचावा झटिती। तो म्हणे पाचारावे देवशैल्यासी। तोच असे व्यूहाचा जाणता।।४।। प्रधाने आज्ञापिला देवशैल्य। तयासी आज्ञा देई दैत्य मल्ल। व्यूह रचावा भयवर्धन। शैल्य वीर तयासी सांगतसे।।५।। मुख्य व्यूह असती तीन। शकट व्यूह परम कठीण। तैसाच दुसरा चक्रव्यूह जाण। तिसरा सूचकव्यूह ही दारूण असे।।६।। प्रधाने विचारीले सेनापतीसी। सेनापती म्हणे रचावे चक्रव्यूहासी। दिधली

आज्ञा देवशैल्यासी। देवशैल्य चक्रव्यूह रचीतसे।।७।। देवशैल्य म्हणे ते वेळी। युद्धास येईल चंद्रमौळी। त्याचे गण मांडतील युद्धफळी। तेव्हा संकट वोढवेल।।८।। यालागी तो म्हणे सेनापतीसी। तुम्ही चला व्यूहरचनेसी। तुमचे युक्तीप्रमाणे त्या त्या स्थळासी। आम्ही नेमू निश्चयेसी।।९।। सर्व मिळून चक्रव्यूह रचिती। चक्राकार व्यूहाची आकृती। दश मदोन्मत्त हत्ती अन् महारथी। ऐसा आवर्त रचलासे।।१०।। ऐसे तीन आवर्त दुर्जय फार। त्यामागे केले अश्वसार। त्याची सप्त आवरणे विविधाकार। रचिता झाला देवशैल्य।।११।। त्याचे मागे पदाती वीर। जे का महायोद्धे रणशूर। त्याची शत आवरणे दुर्धर। कुशळतेने रचियेली।।१२।। चक्राचा आकार रचिला विशाल। शत धनुष्य प्रादेश स्थळ। सुरार्दन नामें दैत्य प्रबळ। रक्षण ठेविला स्वसेनेसी।।१३।। ऐसा एक आवर्त जालियावरी। सहस्त्र धनुष्ये अंतर निर्धारी। सेनानायक कोलाभिध देवारी। रक्षक ठेविला स्वसैन्या।।१४।। ऐसे सेनानायक नेमिले अंतर करून। सप्त आवरणें रचिली जाण। परम दुर्जय भयवर्धन। व्यूहामध्ये मल्ल स्थापिला।।१५।। गर्जती सारे सिंहनादे करून। भूमी कापे थरथरून। इंद्र झाला चिंताक्रांत ऐकोन। बोलाविले त्याने बृहस्पतीसी।।१६।। इंद्र गुरू आले शिवसभेत। कर जोडूनी सांगती वृत्तांत। म्हणे ससैन्य आला मल्लदैत्य। शिव म्हणे मी मारीन त्यासी।।१७।। तुम्ही रणभूमीस चला त्वरेकरून। आज्ञा देई विरोचना लागून। म्हणे नंदीस आणा बोलावून। सत्वर चलावे रणभूमीसी।।१८।। सत्वर नंदी येई शिवाप्रती।

रत्नपालाण नंदीवर घालती। सिंहपृष्ठी चरण ठेवून पशुपती। नंदीवरी आरूढ झाला।।१९।। सभोवती श्वानांची दाटी बहुत। सव्यभागी चंडीशगण रणपंडित। वामभागी बलसंपन्न वीरभद्र। काळाग्निरुद्र शिवासवे चालती।।२०।। स्वामी शिवासी सांगे वर्णुन। वज्रधर, गणपती, चंद्र, सूर्य। तैसे गरुडचिह्नांकित विष्णुसैन्य। ऐसे अपूर्व सैन्य आपुले।।२१।। आपुले सैन्य पाहून त्रिपुरसूदन। अमृत दृष्टीने पाही आनंदघन। दैत्यसैन्य क्रूर दृष्टीकरून। पाहता झाला उमापती।।२२।। वीरभद्रास म्हणे शिव मल्लसैन्य पाहून। व्यूहदारी असे सुरेंद्रदर्पदलन। त्याचे शिर आणि छेदून। त्वरा करी मम आज्ञा।।२३।। आला वीरभद्र व्यूहदारासमीप। राक्षस जे आले सन्मुख। त्यांची शिरे छेदी क्षणात एक। राक्षस रथातूनी बाण वर्षती।।२४।। तया मारण्या धावती राक्षस। वीरभद्र प्रसवी रोमकूपातून गण। एका राक्षसासवे एक गण। ऐसे तुंबळ युद्ध माजले।।२५।। वीरभद्राने केले व्यूह विदारण। सेनानायक कोला नेला शिर छेदून। सेनापती सोडी अग्निअस्त्र जपून। वीरभद्रे अस्त्र गीळीले ते।।२६।। मग निर्वाणीचे ब्रह्मास्त्र सोडी दुर्जन। वीरभद्रे गीळिले मुख पसरुन। मग सुरेंद्रदर्पदलनाचे शिर छेदून। शिवदर्शना आला वीरभद्र।।२७।। क्रोध न साहे मल्ल दैत्यासी। त्वरेने आला अग्रभागासी। सिंहनादे गर्जे पापराशी। जैसा मेघ आकाशी गडगडी।।२८।। दैत्यसैन्य पाहुनी भारी। क्रोधे खवळे घृतमारी भयंकरी। विशाल वदन पसरून ते वेळी। दैत्य भक्षावया धावतसे।।२९।। मुख पसरीले तिने विक्राळ। जिव्हा लळलळीत भयंकर। सारथी अश्व गजासहीत वीर। मुखी घालूनी ती खातसे।।३०।। मल्ल

दिव्य धनुष्य घेऊन हाती। अमोघ बाण काढी शीघ्रगती। वर्म लक्षुनी विंधी घृतमारीसी। घृतमारी पडली मूर्च्छा येऊन।।३१।। शिवे आज्ञापिले रुद्रकालाग्नि। आणा घृतमारी सावध करूनी। तेणे शिवपंचाक्षरी मंत्र जपूनी। सावध करुन नेले मारीसी।।३२।। घृतमारी शिवसैन्यी गेल्यावरी। मल्ल अन् प्रधान विचार करी। म्हणे एक स्त्री आली मारी। तिने दैत्य बहुत भक्षिले।।३३।। आता ही रणभूमी सोडून। मी न जाय परतोन। आता शिवासवे युद्ध दारूण। करीन मीच निजबळे।।३४।। प्रधान म्हणे जी दातारा। हाची निर्धार करावा खरा। रणी अमरसैन्य मारूनी वरा। आपला यशध्वज उभारू।।३५।। युद्धमदे अति मत्त झाला। काही न सूचे मल्लासूराला। सिंहनादे बोले शिवाला। युद्धास तू ये सामोरी।।३६।। पाही माझ्या कुंजरपंक्ती। शुभ्रवर्ण चतुर्दंत विराजती। रत्न-अलंकारे ऐसे शोभती। दुजे ऐरावत जणु काही।।३७।। ऐसे माझे गजकोटी सोज्वळ। तुज जवळी एक वृषभ निर्बळ। उगाच करिसी व्यर्थ बरळ। समता करीसी बुद्धिहीना।।३८।। मी दिव्यांबरे परिधान केली। ज्यांची प्रभा पडे मंडळी। रत्नमौक्तिके सभोवती लाविली। रविकिरणांसम तेजस्वी।।३९।। तुझे व्याघ्रचर्म वस्त्र अवलोकी। तेणे गुह्याचे रक्षण करीसी। भिक्षेचे अन्न तू भक्षिसी। कैसे कालक्रमण करीसी तू।।४०।। तुझी एक स्त्री बहुकाळाची। दुसरी जटेंत ठेविली साची। उभयतांची भेट कैची। तू दुर्बळ म्हणूनीया।।४१।। मज असती सहस्त्र योषिता। अति लावण्य रुपलता। हेमवसन परिधान

करीता। आनंद मानिती निशिदिनी।।४२।। मज पाच पुत्र आहेत प्रतापवंत। युद्ध विषयी रणपंडित। स्वरुपेकरून मदन मूर्तिमंत। सर्व विद्याविषयी कुशल जे।।४३।। तुज असती फक्त पुत्र दोन। त्यामाजी एक असे गजवदन। तया बैसावया मूषक वाहन। विशाल पोट विरुपता।।४४।। तू स्वयं असशी पंचवदन। पुत्र दुजा तुझा षडानन। तयासी असती द्वादशनयन। मयूर वाहन तयाचे।।४५।। आमचा शत्रु असे पाकशासन। तुजसवे नसे वैर जाण। जर तुज रुचेल न हे पाहून। आजची तुज मारीन पशुपती।।४६।। ऐसा मत्त मल्ल दुर्जन। तेणे वाग्बाणे ताडीला पंचवदन। क्रोधे आरक्त झाले नयन। पाहोनी वीरभद्र बोलतसे।।४७।। पाप्या तू शिवनिंदा करीशी। मारीले मी तव सकळ सैन्यासी। छेदीले असते तुझे शिरासी। परी आज्ञा नसे शिवाची।।४८।।अरे शतमूर्खा मल्लासूरा। तुझा मरणकाळ समीप आला। म्हणूनी वदसी दुष्ट वचनाला। शिवचरित्र न जाणसी तू।।४९।। वीरभद्र मग विनवी शिवासी। द्यावी आता आज्ञा मजसी। आणीन छेदून मल्ल मस्तकासी। खड्ग त्रिशूळ घेऊन हाती ।।५०।। वीरभद्रास सांगे सदाशिव। अरे हे पूर्वीचे मधुकैटभासूर। विष्णु कर्णमलापासून क्रूर। कृष्णवर्ण कृष्णमती असती ते।।५१।। परम उन्मत्त हे पापमती। मारु इच्छिती ब्रह्मदेवाप्रती। चतुरानन पाहे घाबरून अती। म्हणे आता कैसे करावे।।५२।। चित्ती मग करी विचार। योगमाये व्यापिला रमावर। तो सावध झाल्यावचून असूर। नाश न पावती सर्वथा।।५३।। मग योगमायेचे स्तवन। करिता झाला चतुरानन। ती योगमाया होऊन प्रसन्न। जागृत केले विष्णुसी।।५४।। ब्रह्मदेवाची

स्तुती ऐकून। झाले संतुष्ट लक्ष्मीरमण। दैत्य परम भयंकर पाहून। युद्धालागी मिसळले।।५५।। पाच दिव्य सहस्त्र वर्षेपर्यंत। मल्लयुद्ध झाले अद्‌भूत। परी नाटोपती दैत्य उन्मत्त। तेव्हा विष्णु युक्ती करी।।५६।। आपली योगमाया घालून। दैत्य मोहिले न लागता क्षण। विष्णू म्हणे त्या दैत्यांलागून। वर मागा देईन मी।।५७।। हासून बोलती दोघे असूर। तू आम्हासी काय देणार। आम्ही करू त्रैलोक्याचा अधिकार। आपले भुजबळे करुनीया।।५८।। तुजसी जर मागायाचे असेल। ते आम्हापाशी माग होऊनी बळ। मग विष्णु म्हणे तुम्ही आहा सबळ। मागेन ते मज द्यावे।।५९।। विष्णु म्हणे मरा मम हस्ते करून। हासून बोलती दैत्य ऐकून। म्हणती कपटे जिंकीले वर मागून। परी आमुची इच्छा उरली।।६०।। विष्णु पूसे मग असुरांसी। सांगा कोणती इच्छा मानसी। दैत्य म्हणती युद्धी जिंकावे दोघांसी। हे पूर्ण न झाले यासमयी।।६१।। कोण दोघे विष्णू ते अवसरी। म्हणती मल्लयुद्धी तोषवावा त्रिपुरारी। तैसीच योगमाया तोषवावी समरी। आपुल्या भुजबळे करूनी।।६२।। सांगे तयांसी रमारमण। कालांतरे इच्छा होईल पूर्ण। ऐसा वर तयांसी देऊन। शिरे छेदिली त्या दैत्यांची।।६३।। तेची हिरण्यकश्यपूचे वंशी। शुंभ निशुंभ नामें पाप राशी। त्रैलोक्य जिंकुनी देवेंद्रासी। दास करूनी ठेवीले त्यांनी।।६४।। महामाया मग उत्पन्न होऊन। शुंभ निशुंभ टाकीले मारून। सकळ सुरवरांस सुख देऊन। महामाया हरी भार जगताचा।।६५।। तेच हे मणि मल्ल असूर। यांचे सांगितले तुज जन्मांतर। यांचा वध मी करीन साचार। कौतुक नयनी अवलोकीजे।।६६।। ऐसे बोलोनी उमापती। घेई पिनाक

धनुष्य हाती। तीव्र बाण घेऊनी हाती। मारी दैत्याचे मर्म लक्षुन।।६७।। दैत्ये धनुष्य घेऊनी हाती। दशबाणे विंधिला पशुपती। बाण येता पाहूनी उमापती। हुंकारे करून भस्म करी।।६८।। मल्ल त्वरेने धावला भाला घेऊन। शिवे छेदून टाकी बाणे करून। मग मल्ल मेघ ऐसा होऊन। तेथूनी पाषाण वर्षितसे।।६९।। शिव सोडीतसे वज्रास्त्र। मही उलथोनी पडला दैत्य। क्रोधे गर्जतसे मल्लासूर। नादे कोंदले संपूर्ण अंबर।।७०।। शिव मग टाकी अग्नि अस्त्र। धैर्य करून मल्ल टाकी पर्जन्यास्त्र। हे पाहून शिव टाकी वायु अस्त्र। मल्लासूर सोडी पन्नगास्त्र।७१।। उमापती मग टाके गरुडास्त्र। मल्ल शिवावर टाकी ब्रह्मास्त्र। शिव आज्ञापी कालाग्निरुद्रास। ब्रह्मास्त्र टाक भक्षुनी।।७२।। कालाग्निरुद्र टाकी ब्रह्मास्त्र भक्षुन। पाहोनी संतप्त झाला मल्लदुर्जन। मग मल्ल करी गदा घेऊन। म्हणे मजसी गदायुद्ध करी।।७३।। मल्ल म्हणे शिवालागुन। जरी असशी तू बलसंपन्न। तरी तारण्यरुप धरून। युद्ध करावे तू मजसी।।७४।। हे बोल मार्तंड भैरव ऐकूनी। म्हणे असशी तू पापखाणी। गिरिजापती दिव्यरुप धरूनी। मल्लासी हाक देतसे।।७५।। भूमी शुद्ध करुनी सत्वर। संधान साधिती एकमेकांवर। परी न चले डाव कुणावर। गदायुद्ध कौशल्य दाखवती ते।।७६।। गदायुद्ध करूनी मल्लासूर। हृदयी आनंद मानी फार।म्हणे मी वीरांमाजी थोर। धन्य आज मी झालोसे।।७७।। मल्ल सांगे शिवालागुन। आता मल्लयुद्ध करू दारुण। मग मल्ल भुजा पिटून। शिवास आव्हान देतसे।।७८।। मल्लयुद्धही झाले दारुण। उसने घाई करिती दोघे जण। दैत्य परम बलसंपन्न। शिवालागी न गणी तो।।७९।।

मल्लयुद्ध झाले नवरात्र नव दिवस। मल्लयुद्ध करूनी तोषवी पंचवदन। मग दैत्य माया करुन। दिग्गज झाला बहु प्रबळ।।८०।। मग शिवे त्रिशूळ घेऊन। तो पाशुपतअस्त्र मंत्रुन। सोडी शीघ्र दैत्य-हृदय लक्षून। मल्ल उलथोनी धरणीस पडला।।८१।। मल्ल मस्तकावरी शिव ठेवी चरण। मल्लाची दुर्गती गेली नासोन। दैत्य अष्टभावे सदगदीत होऊन। पात्र झाला शिवकृपेसी।।८२।। मल्लासुरास झाले नारदाचे स्मरण। तेणे सांगितले मानसपूजा विधान। मल्ले मानसपूजा सभक्ती करून। सदाशिव परम तोषविला।।८३।। मल्लासुर विरक्त होऊन। शिवास विनवी कर जोडून। म्हणे मी पापी असे दारुण। कृपा मजवरी करी गा।।८४।। तू देवांवर अनुग्रह करिसी। दैत्यांवर का निग्रह करिसी। तुझी लीला तूच जाणसी। मजसी ती न कळे स्वामिया।।८५।। तू असशी आदिपुरुष निर्गुण। भक्तालागी झालासी सगुण। तूची असशी साक्षात विष्णुपूर्ण। माझे आराध्य निश्चयेसी।।८६।। संतोषे श्रीमार्तंड बोले मल्लासी। म्हणे मज तोषविले युद्धेसी।आणि स्तुती सुमने तोषविसी। इच्छित वर घे मागुनी।।८७।। चिंताग्रस्त झाला पाकशासन। विनवी तो सरस्वती लागून। म्हणे तू मल्ल जिव्हाग्री बैसोन। द्यावी सुबुद्धि तयासी।।८८।। मल्ल म्हणे मागणे काही नसे। तथापि स्वामी तुज प्रार्थितसे। माझे नावे तू ची असावे। द्यावा हा वर दयानिधे।।८९।। माझे नावाचे अक्षर। हे तव नावापूर्वी साचार। येणे करुन माझे अंतर। होईल स्वस्थ दयाळा।।९०।। माझे मस्तकी ठेविला चरण। हा सर्वकाळ असावा जाण। याचा वियोग एकही क्षण। होऊ नये स्वामिया।।९१।। कोणी करती तमोगुणी नवसासी। दोष

सर्वथा नसावा तयासी। तव पदी गती लाभावी पशुसी। हा माझा हट्ट पुरवावा।।९२।। माझे प्राण प्रयाण समयी। तुमचे स्तोत्र केले पाही। ते भक्तीने पठन करीता लवलाही। मनोरथ तयांचे पूर्ण करावे।।९३।। हे ऐकोनी म्हणे मार्तंड भैरव। तू जे काही मागितले वर। ते तुजलागी दिधले साचार। निश्चयेसी जाणीजे।।९४।। मल्ले शिवासी नमन करुन। प्राण सोडीला न लागता क्षण। ज्योती निघाली अति दारुण। ती मार्तंड भैरवमुखी संचरली।।९५।। मग शिवाज्ञे मल्लासूराचे कलेवर। उचलोनी ठेविले सिंहासनावर। परम तेजस्वी जैसा दिनकर। नीलवर्ण तनु शोभतसे।।९६।। शिवासी यश प्राप्त झाले। देव हर्षे नाचू लागले। पुष्पवृष्टी होतसे ते वेळे। आनंद न माय सुरवरा।।९७।। शिव नंदीवरी बैसले। सभोवते गण चालले। इंद्रादि देव तये वेळे। समागमे पादचारी जाताती।।९८।। ऐसा मिरवत आला शिबिराप्रती। देवपत्न्या ऋषीपत्न्या ओवाळिती। सुंदर दीपपात्रे घेऊनी हाती। करती औक्षण शिवाचे।।९९।। सर्वांनी जयजयकार केला। शिव नंदीवरूनी उतरला। जाऊनी सिंहासनावर बैसला। अमर घालती लोटांगण।।१००।। कथा मल्लासूर शिव युद्धाची। निरोपिली अक्षरी साची। कृपा असे ही स्वामी समर्थांची। आनंदे गणेश चरणी लोळे।।१०१।।

श्री मल्हारीमार्तंड चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

हा अध्याय करीता पठण। सारे घोर संकट घाली लोटांगण। रोग अपमृत्युचा चालू येथेच अक्राळ विक्राळ। राजा होऊनी मल्हारीमार्तंड सोडव माझ्या मागील हे लचाळ। सोडव मला संसाराच्या या मायाजाळातून। आत्मा जन्ममृत्युच्या फेऱ्यात न गुंतता स्वस्थ बसेल।

।। श्री ।।

## ।। ऋणमोचन अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री मल्हारीमार्तंडाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जय जय श्री स्वामी समर्था। ठेवितो चरणी मी माथा। श्री मल्हारीमार्तंड विजयकथा। अद्भूत वर्णविली मम हस्ती।।१।। मणि, मल्ल दैत्य रणी निमाले। पुढे काय वर्तमान घडले। दैत्य रसातळासी गेले। कथा वर्णावी गणेशहस्ती।।२।। मल्लासूर निमाला रणांगणी। शोक करी त्याची कामिनी। पंचपुत्र तियेचे प्रतापी रणी। संग्राम करण्यासी निघाले।।३।। उलूक विनवी कुंभासुरासी। मल्ले अव्हेरीले विष्णुवचनासी। त्याची गती झाली कैसी। करावा आपण विचार स्वामी।।४।। कुंभादि याच मल्लासूराचे पुत्र। उल्लुक सेनापती सह जात। चतुरंग सेना जमवुनी बहुत। रणभूमीस ते पातले।।५।। शिवाशी समजले हे वृत्त। शिव चंडीशगणास आज्ञा देत। सांगा त्या रसातळा जावे सत्वर। प्राण आपुले वाचवावे।।६।। जरी हे न रुचेल त्यांचे चित्ती। तरी तू शाप द्यावा त्वरिती। पर्वत व्हावे तुम्ही पापमती।

भैरवाज्ञे करुनीया।।७।। ऐकोनी चंडीशाचे वचन। कुंभासूर वदे क्रोधे खवळून। म्हणे पाठव प्रत्यक्ष शिवालागून। त्यासी वधाया रणी आलो।।८।। ऐकता कोपे बोले चंडीश गण। म्हणे पर्वत व्हावे शिवाज्ञे करून। चंडीश मुखातुन येता शापवचन। पर्वत झाले पाचही पुत्र।।९।। मल्लपत्नी करी शोक दारुण। उलुक म्हणे ऐका माझे वचन। रक्षावे कुळ आपण यत्ने करून। जावे शरण आपण शिवासी।।१०।। मणिने गाईले शिवस्तवन। मल्लासूरे युद्धी तोषविला शिव। मल्लाचे कलेवर असे शिवासन। येथे दोष मुळीच नसे।।११।। शिवास गेलीया आपण शरण। नसे यात लघुत्व जाण। तो सकळ देवदेवतार्चन। सुरासुरावंद्य असे शिव।।१२।। तरी ऐक वचन वो जननी। मम वचनी विश्वास ठेवूनी। मी साम करीतो जाऊनी। तरी आज्ञा मज देईजे।।१३।। उलूक म्हणे वो जननी। जातो कुंभासूर पुत्र सवे घेऊनी। उमापती तोषवू आम्ही स्तवनी। पाताळीचे राज्य त्यास मागतो।।१४।। उलूक मनी करी विचार। भेटावे आपण जाऊनी सत्वर। स्तवनी संतुष्ट करुनी उमावर। मल्लपौत्रास मग भेटवू।।१५।। उलूक शिवसभासंन्निध येऊन। शिवदारी राही उभा जाऊन। त्यासी पाहती शिवसेवक गण। जाऊनी सांगती ते शिवासी।।१६।। शिवे आज्ञापिले सेवक गण। म्हणे या उलूकास सत्वर घेऊन। गण उलूकास सांगती येऊन। शिवानिकट त्यासी घेऊन आले।।१७।। मग उलूक साष्टांग नमन। करुनी घाली लोटांगण। अष्टांगे सद्‌गदित होऊन। भावे चरण वंदी शिवाचे ।।१८।। करिता झाला तो शिवस्तवन। नेत्री वाहती प्रेमाश्रु जाण। शिवस्तुती करी सद्‌गदित होऊन। म्हणे कृपा करी

दीनवत्सला।।१९।। उलूके प्रसन्न केला उमारमण। शिव म्हणे काय इच्छिते मन। म्हणे मल्ल पौत्र निकुंभासूर। भेटू इच्छितसे तुम्हा दयाळा।।२०।। शिव म्हणे जाई सत्वरगती। मल्लपौत्र आणा मजप्रती। त्याची पाहुनिया भक्ती। प्रसाद करीन जाणीजे।।२१।। शिवाचे अभय घेऊन। आला उलूक राजसदनी परतून। मल्लपत्नी सत्वर येऊन। म्हणे वृत्त निवेदन करी।।२२।। उलूके शिवसभा वर्णन केले। म्हणे तेथे अद्‌भूत वर्तले। शिवासनी मल्ल कलेवर देखिले। बहुत तेजस्वी दिसतसे ते।।२३।। दुसरे एक अपूर्व पाहीले। शिवास अमर वंदिती जे वेळे। तेव्हा मल्लासूर कलेवर नमिले। ऐसे चित्ती वाटतसे।।२४।। मल्लासूराचे भाग्य काय वर्णू। सिंहासनावर शोभे जैसा भानु। नीळवर्ण धरुनीया तनु। शिवसायुज्य तो पावला।।२५।। ऐकोनी मल्लासूराची राणी। परम हर्ष पावली मनी। म्हणे जावे निकुंभास घेऊनी। सत्वर नेऊनी भेट करावी।।२६।। मग म्हणे ती निकुंभालागून। शिवास करी साष्टांग नमन। जरी शिव बोले कौतुके करून। म्हणावे दासानुदास असे मी।।२७।। निकुंभासूर आला मिरवत। गण जावोनी शिवास सांगत। शिव मग गणांसी आज्ञापित। यावे घेऊनी मल्ल पौत्रासी।।२८।। शिव मग निकुंभास अवलोकून। हासोनी बोले सुवचन। म्हणे दैत्यकुळांचा अभिमान। तुझे नयनी बसतो की।।२९।। निकुंभासूर उभा कर जोडून। प्रार्थितसे तो शिवालागून। माझा पितामह मल्लासूर। संतोषविले त्यासी वर देऊनी।।३०।। माझी दुष्टबुद्धि जाऊन समस्त। तुमचे भक्तीची लागली प्रीत।आपले कृपे व्हावे सनाथ निश्चित। हेची मागाया आलो असे।।३१।। मुलाचे परम गोड

वचन ऐकोन। संतोष पावला मल्ल सूदन। म्हणे पाताळासी त्वरीत जाऊन। राज्य करी सुखरुप।।३२।। उलूक प्रार्थी कर जोडून। म्हणे एक गण द्यावा साह्यालागून। निकुंभास राज्यी स्थापून। गण येईल कैलासासी।।३३।। उलूकाचा अभिप्राय जाणोन। शिवे निघंटगणास बोलावून। म्हणे निकुंभास राज्यी स्थापून। सत्त्वर यावे कैलासा।।३४।। संपूर्ण जनांसी मेळवून। विमानी बैसले उलूक निकुंभासूर। विमान आकाशी संचरोन। रसातळासी विमान आले।।३५।। उत्तम मुहूर्त पाहूनी सत्वर। नगरी प्रवेशी निकुंभासूर। दैत्य करती जयजयकार। गुढ्या तोरणे घरोघरी।।३६।। उलूके राज्याचा निर्बंध करून। मग सुमुहुर्त पाहून। निकुंभास पट्टाभिषेक करून। निघंट तयासी उपदेशीतसे ।।३७।। गण म्हणे इहलोकी सुख भोगून। अंती होशील तू शिवगण। मग सर्व दैत्यांनी आनंद करून। निघंटगण पूजिला संतोषे।।३८।। निघंट मग निघाला सत्वर। बोळवीत आले उलूक, निकुंभासूर। मग तो सर्वांसी आज्ञा देऊन। आकाशमार्गी कैलासी आला।।३९।। निकुंभासुरास राज्य दिधले। सकळा स्वस्थानासी प्रेषिले। मग ऋषींस शिवे बोलाविले। म्हणे तुमचे मनोरथ पूर्ण केले।।४०।। आता जावे तुम्ही आश्रमासी। स्वस्थचित्ते करावे तपासी। करुनिया नित्य अग्निसेवेसी। आनंदयुक्त स्वसदनी रहावे।।४१।। ऋषी मग विनविती शिवासी। यावे आमुचे आश्रमासी। ऐकोनी संतोषला उमापती। म्हणे मनोरथ पुरवू आम्ही।।४२।। ऐसी शिवाची प्रार्थना करून। आश्रमी आणिले पंचवदन। षोडशोपचारे पूजा करून। महानैवेद्य अर्पिती त्यासी।।४३।। ऋषी कर जोडोनी म्हणती। जाता

तुम्ही कैलासाप्रती। इथे आमुची काय गती। म्हणोनी भ्रांती झाली असे।।४४।। शिव म्हणे तुम्ही कराल स्मरण। तेव्हा मी प्रकट होईन। सर्व संकटे निरसूर। सुख देईन मी तुम्हासी।।४५।। ऋषी आश्रमी सुखसंपन्न। अग्निसेवा करीती शिवपूजन। सर्वकाळ वेदाध्ययनें करून। काळ क्रमिती बहु आनंदे।।४६।। ऐसा जाता काळ काही। कली प्राप्त झाला मही। भय पावले ऋषी सर्वही। करती स्मरण ते शिवाचे।।४७।। नानाप्रकारे करती शिवस्तवन। तात्काळ प्रकटला त्रिनयन। म्हणे प्रार्थिले माते का म्हणून। ऐसे कोणते संकट आले।।४८।। ऋषी म्हणती कली आला दारूण। सर्व होतील दोषसंपन्न। ऐसे भय मनी झाले उत्पन्न। म्हणोनी आपणा प्रार्थिले।।४९।। ऐकोनी ऐसे ऋषीवचन। हासोन बोलती पंचवदन। म्हणे जे इच्छित असेल मन। ते मज निवेदन करावे।।५०।। ते म्हणती स्वयंभूलिंग व्हा आपण। आम्ही करु नित्य पूजन। तेणे कलीबाधा न होय जाण। ऐसी आमुची विनवणी।।५१।। तात्काळ लिंगरुप झाला उमापती। भवानीसह तो पशुपती। दोन लिंगे प्रकटोनी निश्चिती। वटवृक्षातळी शोभतसे।।५२।। तो दिवस असे अति उत्तम। मार्गशीर्ष मास शुक्ल परम। षष्ठी भानुवासर सुदिन। ऋषी परमानंदे गर्जती शिवास।।५३।। शततारका नक्षत्र असे सुंदर। कुंभराशी असे निशाकर। पाहोनी ऋषी मन मराळ। हर्षे करूनी सर्व डोलती।।५४।। मग मिळोनिया देवऋषी। येते झाले लिंगापाशी। म्हणती सर्व वर्णांचे ध्यानासी। मूर्ती ऐसी निर्मावी।।५५।। देवऋषींनी मृण्मयी

मूर्ती निर्मिली। लिंगामागे भोगमूर्ती ठेविली। हरिहरात्मक म्हणूनी ऋषीमंडळी। स्तविते झाले आनंदे ।।५६।। समग्र पूजासामग्री सिद्ध करून। देवऋषी करती लिंगाचे पूजन। तैसेच मृण्मय मूर्तीचे पूजन। करीते झाले देवऋषी।।५७।। पाद्य अर्घ्य आचमन अर्पून। सुगंध तैले सर्वेश अभ्यंगुन। पंचामृते स्नान घालून। तोषविती मृडानी रमण।।५८।। धूप दीप उपचारे करून। पंचामृत पूजा संपादिती ब्राह्मण। मग करती निर्माल्य विसर्जन। रुद्राभिषेक ब्राह्मण करती।।५९।। दिव्य वस्त्रे परिधान करवून। यज्ञोपवीत गळा घालून। रत्नजडित अलंकार लेववून। सुगंध गंध लाविती परमानंदे।।६०।। नागवेलीच्या पानें करून। पूजा बांधिती ब्राह्मण। भंडार समंत्रक करून। वाटते झाले लिंगाप्रती।।६१।। तैसेची भंडार देवऋषी वाहती। धूप दीप उपचारे तोषविती। महानैवेद्य रत्नजडित ताटी। वाहुन समर्पिती महादेवासी।।६२।। नाना वाद्यांसह पूजा संपादून। तोषविला त्यांनी मृडानी रमण। मग पुढे कर जोडून। देवऋषी शिवस्तवन करती।।६३।। म्हणती स्वामी मनुष्य हिताकारणें। आम्ही प्रार्थितो दीनवचने। भजन पूजन तुमचे करती जे। त्यांचे मनोरथ पूरवावे जी।।६४।। ऋषी विनविती सनत्कुमारासी। म्हणती जी स्वामी तपोराशी। श्रीमल्हारी चरित्र श्रवणे मानसी। आनंद न समाये स्वामिया।।६५।। तयांसी म्हणती ब्रह्मनंदन। प्रेमपुरी तेहतीस कोटी तीर्थे जाण। त्यांचा महीमा करण्या वर्णन। समर्थ नसे कोणीही।।६६।। देवाचे उत्तरभागी असे शक्ति तीर्थ। मुनिजन त्यास म्हणती लक्ष्मीतीर्थ। चंपाषष्ठी, रविवार, वैधृती व्यतीपात। अश्विन नवमी चैत्र

षष्ठी पूनवेस।।६७।। कार्तिकी पौर्णिमा अन् निज जन्मनक्षत्रास। मौनया तिर्थी स्नान करून। श्री मल्हारीस पूजावे लावून भंडार। सकळ पापमुक्ती होतसे।।६८।। देवाचे आग्नेयेस असे गयातीर्थ। मार्तंड चरण तेथे प्रत्यक्ष। पर्वणी तेथे करावे श्राद्ध। पितर पावती कैलास मुक्ती।।६९।। देवाचे उत्तरभागी असे कपिलतीर्थ। तेथे स्नान करिता कपिला षष्ठीस। सर्व पापांचा होत नाश। स्वर्गतुल्य भोग प्राप्त त्यासी।।७०।। देवाचे ईशान्येस गुप्तमल्लेश्वर तीर्थ। त्या तीर्थी स्नान वा उदकपान।आणि घेता मल्हारी दर्शन। ते सकळ दोषमुक्त होती।।७१।। देवाचे दक्षिणेस पापविनाशनतीर्थ। त्याचे समीप अश्वत्थरुपी भैरव। भैरवास आलिंगुन घ्यावे मल्लारीदर्शन। सर्व ऐश्वर्ये प्राप्त होती।।७२।। पापविनाशन तीर्थासमीप। नंदीकुंड असे पुण्यवर्धन। स्नान करून घ्यावे मल्हारीदर्शन। तेणे पुण्यवृद्धि होतसे।।७३।। देवाचे ईशान्यभागी रुद्रकुंड। योग्यांस तीर्थ असे दुर्लभ। त्या तीर्थी करिता स्नान। पुन्हा जन्मास न येती।।७४।। देवाचे उत्तरभागी अंबुधारातीर्थ। त्या तीर्थाचे करता उदकपान। स्नान करुन जावे मल्हारी शरण। सकल पापमुक्ती होय।।७५।। ऐसी अष्टतीर्थे अनुक्रमे करुन। जे नरनारी करिती नेमे करून। ते इहलोकी परत्री सुखसंपन्न। श्री मल्हारी कृपे होती।।७६।। ऋषींनी अष्टतीर्थ श्रवण करून। त्यांसी झाले परमसमाधान। सनत्कुमारास विनविती कर जोडून। तीर्थ आणखी सांगीजे।।७७।। सनत्कुमार सांगे ऋषीसत्तमां। ऐका षष्टतीर्थाचा महिमा। याहुनी तीर्थस्नान-दान-धर्मा। प्रेमपुरी बहु असती।।७८।। रामतीर्थी करिता स्नान। घेई मणिद्विषाचे दर्शन। सप्तजन्मीचे

पापदहन। क्षणामाजी होतसे।।७९।। मल्लेश्वर तीर्थी करिता स्नान। मल्लारीचे घेता दर्शन। ब्रह्महत्येचे पाप दारूण। क्षणमात्रे नाश पावे।।८०।। सूर्यतीर्थी करिता स्नान। एक मास नेमे करून। तयाची अष्ट कुष्ठें दारूण। निरसूनी जाती द्विजवर्या।।८१।। मल्हारीचे ठायी प्रेम करून। नृत्य गीत करती नेम धरून। ते नर इहलोकी सुख भोगून। अंती वसती कैलासी।।८२।। क्षेत्राचे पूर्वेस असे शोणतीर्थ। त्या तीर्थी स्नाने होय पापमुक्त। त्याचे दैन्य नासूनी जात। कैलासी भोगी तो ऐश्वर्य।।८३।। देवाचे पश्चिमेस वैतरणानदी। सूर्यग्रहणी तेथे स्नान करूनी। करती मल्हारीची पूजा जाऊनी। ते रुद्रलोकी जाती।।८४।। जे रामतीर्थी स्नान करती। ते सकळपापमुक्त होती। ते अंती कैलासी वसती। बहुत सुख भोगिती ते।।८५।। शिवतीर्थी जे स्नान करिती। ते इच्छिले फळ पावती। कोटीतीर्थ असे क्षेत्र दक्षिणभागी। तेणे कोटी जन्म पाप नाशे।।८६।। कोटीतीर्था समीप असे अश्वतीर्थ। स्नाने लाभते स्वर्गतुल्यसुख। अश्वतीर्था समीप असे शक्तितीर्थ। स्नाने शक्तिलोक प्राप्त होई।।८७।। क्षेत्राचे पूर्वभागी उग्रकुंडपावन। स्नाने दशयज्ञ फळ प्राप्त होईल। गणपती तीर्थी करिता स्नान। विघ्ने तयाची जाती पळून।।८८।। कोणे एके समयी भैरव आपण। मृगयेस गेले गण घेऊन। तेथे वराहवध करिता जाण। काळभैरव तीर्थ झाले असे।।८९।। वैतरणा नदी गरूड गंगा संगमी। वटवृक्ष असे तया दक्षिण प्रयागातिरी। त्या वटवृक्षाचे पूजन प्रदक्षिणा करती। त्यास पृथ्वी प्रदक्षिणा पुण्य मिळे।।९०।। मल्लाचे वारूणास्त्र दारूण। जेथे शांत झाले शिवप्रभावे करून। ते वरूण तीर्थ झाले पुण्यवर्धन। तेथे स्नान

करून सर्व मुक्त होती।।९१।। कोणे एके समयी पाही। पार्वती पादप्रक्षालन करी लवलाही। तेथे पार्वती तीर्थ झाले मही। पुण्यदायक ते सर्वांसी।।९२।। तयाचे उदक बिंदु गंगाभाळी लागले। तेणे गंगा संतप्त झाली कोपे। भैरवे गंगा-पार्वती ऐक्य केले। म्हाळसा नाव पार्वतीस ठेवीले।।९३।। तैसेची पुण्यपावन अगस्ती तीर्थ। तैसेची असे गौतमी तीर्थ। अत्रीतीर्थ, पुलस्तीतीर्थ, भृगुतीर्थ। अंगिरातीर्थ भारद्वाज तीर्थ।।९४।। वसिष्ठतीर्थ, कश्यप तीर्थ। सनकतीर्थ, जमदग्नी तीर्थ। भगीरथतीर्थ, च्यवनतीर्थ। सनातन तीर्थ, अंबऋषीतीर्थ।।९५।। सुराचार्य तीर्थ, कल्लोळ तीर्थ। पाराशरतीर्थ, मतंग तीर्थ। पुंडरीकतीर्थ, कौशीक तीर्थ। कण्वतीर्थ, वत्सतीर्थ, मांडव्यतीर्थ।।९६।। वैश्वानरतीर्थ, कुंडनाभतीर्थ, व्यासतीर्थ। सांख्यायन तीर्थ, कुशतीर्थ। गालव तीर्थ, सौभरी तीर्थ। वांछायन तीर्थ, शांडिल्य तीर्थ।।९७।। मंडुकायन तीर्थ, वाल्मिकतीर्थ। जाबालीतीर्थ, आलंवयन तीर्थ। गर्गतीर्थ मौनसतीर्थ। ऋषी पुण्याकारणें ही तीर्थे झाली।।९८।। कंदपतीर्थी, हरिहरतीर्थी। कुबेरतीर्थी जे स्नान करिती। ते नर अवश्य धनवान होती। ऐसा तीर्थ महिमा असे।।९९।। वायुतीर्थी जे स्नान करिती। ते बलवान होती निश्चिती। ऐसा तीर्थमहिमा ऋषींप्रती। सांगता झाला सनत्कुमार ।।१००।।

श्री मल्हारीमार्तंडचरणार्पणम्सतु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

हा अध्याय करीता पठण। सकळ जीवनाचा होईल उद्धार। स्मरण करूनी अध्यायातील भाव। रक्षण करीसी मल्हार तयाचे। सकल तीर्थाचे पूण्य लागून। जीवन मार्ग तो सफल करी।

।। श्री ।।

# ।। शापमोचन अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री मल्हारीमार्तंडाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री सद्‌गुरू स्वामी समर्था। वर द्यावा या लक्ष्मणसिंधुसुता। श्री मल्हारीमार्तंड रोचक कथा। उतरविण्या नवशतीत।।१।। ऋषी सनत्कुमारासी विनविती। सांगावा मल्हारी पूजन विधी। ते कारण सनत्कुमार निवेदिती। मल्हारी पूजाविधी तात्काळ।।२।। मल्हारीपूजने मल्हारी प्रसन्न होत। पूजा करणारासी होई फळ प्राप्त। मल्हारी पूजन रहस्य जो श्रवण करीत। तयाचे मनोरथ पूर्ण होती।।३।। एकाग्र चित्ती सावेव कल्पावी। मानसपूजा षोडशोपचारी अर्पावी। तैसे गुरूमंत्र घेऊन जपकरी। तोही सकळ सिद्धी पावतसे।।४।। शिव म्हणे मुख्य असावी भक्ती। भक्ती असता तेथे उपजे प्रीती। तेथेची कांक्षा जाण निश्चयेसी। अष्टविध भक्ती मज प्रिय।।५।। पूर्वपुण्ये भक्ती घडे म्लेंच्छास। तरी ती लवलाही आवडे मज। तोही पावेल सकल सुखभोग। अंती तो पावे शिवलोक।।६।। पूजक उपासक

जरी असेल चांडाळ। त्याचेही पूजने मज बहुसंतोष। त्याची स्तुती मज आवडे बहुत। प्रसन्न असे मी त्याजवरी।।७।। प्राचीन कर्म भोगल्यावाचून। कदाकाळी न सुटे जाण। परी एकची जन्मी भक्ती करून। मुक्ती होय प्राप्त निश्चयेसी।।८।। ऐसे महिमान सांगितले विस्तारून। तैसेची करती पूजाविधी निरुपण। केले पाहीजे सर्वांनी श्रवण। सनत्कुमार जे वर्णिती।।९।। प्रथम आचार्य ब्रह्मणोत्तम। त्यावरही मार्तंड उपासक निस्सीम। त्यासी साष्टांग घालूनी नमन। करुनी पूजन अनुग्रह घ्यावा।।१०।। प्रतिमा सुवर्णी अथवा रजताची। अथवा असो पाषाण मृत्तिकेची। करावी सलक्षण तीची मूर्ति। दोन प्रकार येथे ध्यानाचे।।११।। अश्वारूढ म्हाळसासहीत। करी खड्ग डमरु विराजित। दोन हस्त सुशोभित। चरणीं मणि मल्ल मस्तकें।।१२।। दुसरा प्रकार असे तंत्रोक्त। चतुर्भुज मूर्ति सुशोभित। गंगा म्हाळसा दोन्ही विराजित। उभय भागी मल्हारी देवाच्या।।१३।। याहूनी भक्तासी आवडे बरवे। तेंची देवपाटी सभक्ती स्थापावे। त्यासीच भावे षोडशोपचारे पूजावे। परम भक्ती असावी मनी।।१४।। मल्हारी महात्म्य पुस्तक अलौकिक। तेची मल्लारी स्वरुप जाणून। पूजावे भंडार व्हावा नेमेंकरून। तेणे सकळसिद्धी लाभती।।१५।। श्वेत पीत रक्त मंदार। चाफा बकुळी पुन्नाग धत्तुर। तैसेच पाटल पुष्पे रक्त श्वेत। असती बहु प्रिय शिवासी।।१६।। या पुष्पी जो करी पूजन। तो इहलोकी होईल संपन्न। तैसेच पाच पत्रे सुंदर वाहून। पूजिता इहलोकी होई धनवान।।१७।। तैसेच धूप अति सुगंधित कीजे। दीप त्रिवर्ती मेळविजे। नैवेद्य षड्रस पक्वान्न कीजे। शिवास परम भक्तिभावे।।१८।। तांबुल करावा

त्रयोदशगुणयुक्त। तो देवासी अर्पावा भावयुक्त। सुवर्णदंड मयुर पिच्छांची चामरे। मल्हारी मस्तकी ढाळावी।।१९।। गीत वाद्य आदर्श निर्मळ। जयघंटा वाद्य अर्पावी प्रबळ। ऐशा पूजने पूजावा भगवान। इप्सितार्थ होती प्राप्त।।२०।। चैत्र शुक्ल तृतीये पासून। वैशाख शुद्ध तृतीये पर्यंत। डोल्हारा निर्मून रत्नजडित। म्हाळसा-बाणाईसह मार्तंड पूजावा।।२१।। गुलाल टाकावा देवावरी। भंडार वहावा सहपरिवारी। पुष्पे सुगंधित दवणावरी। वाहूनी मल्लारी पूजीजे।।२२।। ऐसी पूजा करिती नेमधरून। ते इहपरलोकी सुखसंपन्न। राज्यतुल्य भोग भोगून। अंती कैलासी जाऊनी राहती।।२३।। मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपासून। घटमाळा इत्यादी करून। पाच दिवस उपोषण करून। षष्ठीस पारणें करावे।।२४।। सहा दिवस आनंद करून। आनंदवावा म्हाळसारमण। क्रोध तामसवृत्ती टाकून। हे षष्ठीव्रत आचरावे।।२५।। तेणे पदोपदी यज्ञाचे फल होय। इहलोकी तो विजयी होय। तयाच्या पापांचा होई क्षय। यात्रेस जाता निश्चयेसी।।२६।। पुढे कली येणार दुस्तर। म्हणूनी ऋषींनी प्रार्थिला उमावर। संतोषोनी प्रकटला मृडानीवर। लिंगरुपी तो प्रेमपुरी वसे।।२७।। मल्लासूरे देहावसानी। वर मागितला शिवालागुनी। जे रुप दाखविले नयनीं। त्या मूर्तिची भक्त पूजा करिती।।२८।। तो वर स्मरोनी मृडानीपती। प्रेमपुरी करुनीया वस्ती। भक्तांचे नवस पूरविती। भक्तकाम कल्पद्रुम ते।।२९।। आता गतकथानुसंधान। जिज्ञासूंचे असती सहा प्रश्न। यासी प्रमाण जयाद्रिमहात्म्य। मल्हारीमहात्म्य स्कंद पुराण।।३०।। कल्पकाचा प्रश्न सुरस। मार्तंड अवतार कोणे मन्वंतरास। मातापिता असे

यास। किंवा नसे हा पहिला प्रश्न।।३१।। चवदामाजी दुसरा मनु। स्वारोचिष असे अभिधानु। त्याचे एकतिसावे द्वापार परिपूर्णु। होता अवतार झाला असे।।३२।। वसंत ऋतु चैत्र मास। शुक्ल पक्ष रविवार दोन प्रहर दिवस। चित्रा नक्षत्र मूळ रोहिणी विलास। तेव्हा रुप धरी उमापती।।३३।। मार्तंड भैरवाचे उग्र तेच आगळे। देवऋषी पाहते झाले। सर्वांनी आश्चर्ये झाकीले डोळे। सारे स्तविती भक्तिभावे ।।३४।। मग येळकोटी नामें करून। देवऋषी आरोळी देती गर्जुन। गुलाल भंडारे करून। आच्छादिती ते भैरवासी।।३५।। दुसरा प्रश्न सांगू संक्षेपे करून। कैसे म्हाळसा-गंगा अभिधान। तयाचे निवेदून कारण। संतोषवू भक्तांसी।।३६।। पूर्वी मंदाचल शिखरी। उमेस बैसवूनी अंकावरी। अति आनंदे त्रिपुरारी। देवांस वरप्रद झाला असे।।३७।। पुढे सुरवर कर जोडून। उभे असती इंद्र आदि करून। गिरिजेस पाही गंगा जटेतून। म्हणे धन्य ही हिमनगबाळी।।३८।। गिरिजा मनीं करी विचार। गंगा वसे शिवमस्तकावर। मज हून तिचा महिमा थोर। यास उपाय काय कीजे।।३९।। उभयतांचे मनीचे इंगीत। मनी समजे षण्मुखतात। म्हणे यांचा पुरवावा हेत। परी न बोले काही।।४०।। शिवास विनवी हिमनगबाळी। गंगा जटेत किती दिन ठेवावी। आता तियेसी काढावे बाहेरी। कृपाकरूनी दातारा ।।४१।। गंगा एका अंकी बैसवून। दुसरे अंकी मी बैसेन। उभयता एकचित्ते राहून। आनंदवु स्वामी तुम्हासी।।४२।। ऐकोनी बोले चंद्रशेखर। म्हणे बरा मागितला वर। तो काळे करूनी होईल सफल। परम संतोषली भवानी।।४३।। प्रेमपुरी पार्वती तीर्थ पाहून। मार्तंड भैरव करी वंदन। गंगामस्तकी

स्पर्शिले जल उडून। क्रोध न सारे गंगेसी।।४४।। झाला दोघींचा कलह पाहून। आनंदे हासे चंद्रभूषण। मग दोघींचे ऐक्य करून। दोही अंकी बैसविल्या।।४५।। पूर्वी विष्णुस इंद्र म्हणे लक्ष्मीपती। बहुत रत्ने समुद्रामाजी असती। ही कोण्या योगे निघती। सांगा मजसी दयानिधे।।४६।। विष्णु म्हणे समुद्री रत्ने प्रमाण। परी समुद्र मंथल्यावाचून। प्राप्त न होती तुम्हालागून। तरी दैत्यासी सख्य करावे ।।४७।। देव दैत्ये केले समुद्रमंथन। परी हालाहल निघाले प्रथम। म्हणे विष्णु जो याचे करी निवारण। तोच होईल रत्नांचा अधिकारी।।४८।। इंद्र स्तवीला उमावर। जो का काळाचा हर। तयाने मुख पसरुन सत्वर। विष क्षणात प्राशिले।।४९।। रत्ने देवांनी वाटून घेतली। परी खाली शेष दोन उरली। अमृत आणि मद्य ते वेळी। दैत्य बोलती विष्णुसी।।५०।। तुम्ही आम्हासी ठकविले बहुत। सर्प गरळे दैत्य निमाले बहुत।आता जे राहीले मद्य आणि अमृत। ते आम्ही घेऊ निश्चयेसी।।५१।। तेव्हा विष्णु धरी मोहीनी रुप। देव दैत्य सांगती तिज वृत्तांत। मोहीनी म्हणे बसावे धरूनी पंगत। मी वाढीन मद्य आणि अमृत।।५२।। मोहीनीने कुपी हाती घेऊन। दैत्यांस वाढीले मद्य पूर्ण। देवांस वाढीले अमृत जाण। देवे नेले अमृतासी।।५३।। नंतर एकदा विष्णुस म्हणे शिव। तू धारण केले मोहिनी रुप। ते दाखवी मज सुंदर रुप। इच्छा मनी असे पाहण्याची।।५४।। शिवाग्रहे झाला मोहिनी रमारमण। कामे व्यापिला शिव पाहुन रुप। शिवास मग बोले लक्ष्मीरमण। काळे करुनी पुरवीन मनोरथ।।५५।। पूर्व संकेते स्मरे शिव मोहिनीसी। तात्काळ संचरली पार्वती देही। ते पाहोनी उमारमण चंद्रमौळी। अति आनंद

पावला।।५६।। मोहिनीस महालया शक्ति म्हणती। म्हालसिका तीसच वदती। हे जाणोनी उमेचे उमापतीने। म्हाळसिका-म्हाळसा नाम ठेवले।।५७।। आता हेगडी प्रधान आख्यान। मल्लासूर बोधण्या गेला रमारमण। तोच मूळ दैवत प्रेमपुरी प्रधान। देवऋषींनी स्तविला असे।।५८।। मूळ देव तोची हेगडी प्रधान। कानडी भाषेचे असे प्रमाण। तो प्रत्यक्ष असे मधुसूदन। संशय यात किमपि असेना ।।५९।। कैलासाहून शिव आला भूतलाप्रती। तेव्हा ऋषींनी प्रार्थिला उमापती। प्रेमे धवलगिरी नगा नेती। आश्रम असती तेथे ऋषींचे।।६०।। ऋषींनी भावे पूजिला शंकर। तेथेच लिंग आले शंकरेश्वर। जेथे पाद प्रक्षाळिती ऋषीश्वर। तेची तापशमन तीर्थ जाणीजे।।६१।। प्रथम पर्वतनाम धवलगिरी। प्रस्थानी असे म्हणून प्रस्थापीठ निर्धारी। मल्लासूरासी वधिल्यावरी। जयाद्रि नाम विख्यात झाले ।।६२।। पूर्वी कैलास पर्वती। बैसली महेश आणि पार्वती। सिंहासनी बैसूनी अमरांप्रती। वरप्रदान सर्वास देतसे।।६३।। पाहूनी हे पार्वतीची सखी। जया लावण्यलतिका मृगाक्षी। म्हणे पार्वतीचे भाग्य थोर किती। मज ऐसे अर्धासन न मिळे।।६४।। जाहली ती अतीव खिन्न। पार्वती पूसे मग तिजलागुन। पार्वतीची अत्यंत स्तुती करून। मनोरथ आपुले ती सांगतसे।।६५।। पार्वतीम्हणे शिवा प्रसन्न करून। मी तुझे मनीचे आर्त पुरवीन। त्याचा विश्वास मनी धरून। स्वस्थ राही मम आज्ञे।।६६।। शिवास मग विनवे पार्वती। जया नामे असे माझी सखी। तिज वचन मी दिले निश्चिती। तुज भर्ता होईल पशुपती ।।६७।। तरी आपण कृपाळू होऊन। करावे सत्य माझे वचन। तेव्हा गणपतीस साक्ष ठेवून। वर

दिल्हा म्हणे सदाशिव।।६८।। शिव म्हणे ऐक सुंदरी । काळे करून जया दुसरी। ही जन्मेल बाणासुराचे उदरी। बाणा नामे विख्यात।।६९।। पुढे मी मणिमल्ल देत्य वधीन। मल्हारी होईल मम नाम। तेव्हा मी हीज वरीन। अति प्रिय मज होईल ती।।७०।। तेव्हा मी जयासी वरल्यावरी। तुज न व्हावा क्रोध भारी। उमा म्हणे मीच वर दिला म्हणूनी। क्रोध मज कैसा येईल।।७१।। काही काळ लोटल्यावरी। मल्लास मारून शिव जाले मल्हारी। जया जन्मली बाणासुराचे उदरी। ती म्हणे माझा भर्ता शिव।।७२।। नारद तीज म्हणे तपश्चर्येवाचून। शिव भर्ता न होय जाण। मग अघोर वनाते सेवून। बाणा तप करी दारूण।।७३।। तेव्हा पूर्व भाग्ये करून। झाले मार्तंडास स्मरण। म्हणे जयेस दिधला वर। नेतसे सिद्धीस ये समयी।।७४।। शिव जाहला गुप्त म्हणून। गंगा म्हाळसा चिंतातुर। नारद म्हणें तपें साध्य होय हर। पूसती तप कैसे करावे।।७५।। नारदे मंत्र उपदेशिला त्वरीत। अन्नपूर्णा महात्रिपुरा दैवत। स्थापुन एकाग्रचित्ते करा जप। कार्यसिद्धी होईल नवरात्री।।७६।। तप करती गंगा, जगज्जननी। ते स्थळी जननी तीर्थ नामाभिधानी। असे जानाई ही ते स्थळी। नवस फळती ये स्थानी।।७७।। गंगा-म्हाळसा-बाणाईचे ऐक्य। नारदे करूनी दिधले देख। तेणे संतोषला भवमोचक। परमानंदे तो वर्ततसे ।।७८।। समुद्र मंथनी चौदा रत्ने काढीली। त्यामाजी स्त्रीया होत्या दोघी। एक लक्ष्मी घेतली विष्णुनी। दुसरी रंभा इंद्रे घेतली।।७९।। रंभेस जरी घेतले इंद्राने। परी शिवास वरीले तिने मनाने। रंभा करी मंत्रजाप नारदाज्ञे। शिवे तीस नृत्यास पाचारीले।।८०।। शिवास जाहले पूर्व स्मरण। तेणे केले रंभेचे

चिंतन। तव ती संपूर्ण अंशे करून। येती झाली शिवदर्शना।।८१।। तो तीस मार्तंड पाहे नयनी। तिचा देह गेला पालटोनी। रंभेने सुमनमाळा करी घेऊनी। श्री मल्हारी कंठी घातली।।८२।। पाच मुक्ती क्षेत्रे धरेवरी। प्रथम नीलाद्रि कालांजन गिरि। दुसरे विश्वेश्वर वाराणसी। तिसरे क्षेत्र असे मातापुर माहुर।।८३।। चवथे भागीरथी हरीद्वार। पाचवे जयाद्रिक्षेत्र सुंदर। येथे एक दिवस वास झाला जर। पापापासून मुक्त होईल तो।।८४।। रजनीस वर देती उमापती। तू हो औषधी निश्चिती। तेणे कृष्णवर्ण जाऊन पीतवर्ण होशी। सर्वांसी वद्य होशील।।८५।। तुझे चूर्ण करून मी सर्वांगासी। लावीन काळे करुनी निश्चिती। तेव्हा तू भंडार नाम पावसी। होईल भंडार मज प्रिय अती।।८६।। म्हाळसापती जयाद्रीस आले। तेणे देवऋषी आपुले स्थानी उतरले। गणपतीचे स्थान देवेंद्रे घेतले। आला गणपती कैलासासी।।८७।। भैरव इंद्रास बंदी केले। गणपतीने इंद्राचे क्लेश जाणले। भैरवास नमुन तया मुक्त केले। आले मग ते जयाद्रिसी।।८८।। तेणे इंद्र घातला भैरव चरणावर। तेणे गणपतीस साक्षी विनायक। देवेंद्र भैरवे दिधले अभिधान। जगी प्रख्यात झाले असे।।८९।। धर्मराज तेथे आले बंधुसहीत। म्हणती यज्ञ करावा येथ। उदक नसे म्हणून सांगे नारद। कमंडलु ब्रह्माचा लवंडावा।।९०।। मंदाकिनी वोघ आला पाहून। नारदे तेथे केले स्नान। त्या स्थळाचे नाव घोडे उडान। देव ऋषींनी ठेवीले।।९१।। त्या प्रवाहाचे नाव ब्रह्म कमंडलु। कऱ्हा नाव प्राकृत बोलू। मल्हारी तीर्थ, भैरव तीर्थ, लक्ष्मीतीर्थ। जननीतीर्थ लवतीर्थ असती कऱ्हे माजी।।९२।। असती तापशमन तीर्थ, पापशमन तीर्थ। नागतीर्थ,

गणेशतीर्थ ही अष्टतीर्थ। या अष्टतीर्थी स्नान करीता पवित्र। मनोरथ सर्व पूर्ण होती।।९३।। येथे पूर्वेस मोरगावी मोरेश्वर। दक्षिणेस वीरगावी भद्रावतार। पश्चिमेस सासवडी भैरव क्रूर। उत्तरेस भुलेश्वर ऐसी चतुर्द्वारे असती।।९४।। ही चतुर्द्वारे बहुश्रमे करून। एकदिवसी करावी नेमे करून। न होता प्रतिदिवशी एक जाण। करूनी म्हाळसाकांत तोषवावा।।९५।। पंचायतन विधिं मध्ये गंगाम्हाळसायुक्त मल्हारी। ईशान्ये हेगडी प्रधान अवधारी। आग्नेय दिशेस सिंदुरारी। गणपती असे जाणीजे।।९६।। नैऋत्येस पंचलिंग निश्चिती। वायव्येस अन्नपूर्णा भगवती। याचे असे प्रमाण जयाद्रिपर्वती। सूक्ष्मदृष्टीने अवलोकीजे।।९७।। अष्ठपीठे - प्रथम प्रेमपुर विख्यात असे। दुसरे नळदुर्गपीठ असे। तिसरे पालिस लग्न होतसे। चवथे जेजुरी राजधानी।।९८।। पाचवे निंवगाव भीमातीरी। सहावे शेगुड ब्रह्मलिंग निर्धारी। सातवे मंगसूळी कृष्णातीरी। सातारा आठवे असे गंगासंनिध।।९९।। ऐसी आठ पीठें पुण्यवर्धन। श्रवणें अघनासें संपूर्ण। यात्रा करावी भक्ती करून। भक्त अतिप्रिय असे स्वामीसी।।१००।। ऐसे हे मल्हारी आख्यान। समर्था लिहविता नवशतीत। व्हावे अतिप्रिय सदाशिवास। म्हणूनी नम्रत्वे गणेश नमितसे।।१०१।।

श्री मल्हारीमार्तंड चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थचरणार्पणमस्तु।

हा अध्याय करीता पठण। मल्हारी देवाचे करूनी स्मरण। षोडषोपचार करूनी नटविला मल्हारी। भक्ताचे जीवन सकल उद्धारी। पाप शोषूनी देई समाधान। जेजूरी असे तीर्थ क्षेत्र महान।

।। श्री ।।

# ।। परयंत्रादिक्रिया विनाशक अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री मल्लारीमार्तंडाय नमः।श्री ग्रामदेवताय नमः।

स्वामी समर्थ माझी माऊली। भक्तजनांची प्रेमळ साऊली। नैवेद्यादि विधिसंबंधी प्रश्नावली। उलगडवावी या नवशतीत।।१।। मल्हारी देवता पूजा साकार। कंदर्प मिश्र वृंताकभरित साचार। गोधूम पिष्टाचा रोडगा निर्धार। ऐसा नैवेद्य देवास अर्पिती।।२।। तैसेची गांठा दिवटी बुधली तीन। उधळिती खोबरे नवस करून। वाघे मुरळी असती कोण। ऐसे अष्ट प्रश्न असती।।३।। पोवतें का गळा घालिती। ध्वज शिखरासी का लाविती। ऐसे एकूण दहा प्रश्न निश्चिती। प्रथम यथामति निवेदू।।४।। कंदर्प भक्षावा चंपाषष्ठीस। नैवेद्य दाखवावा देवास। यास प्रमाण जयाद्रिमहात्म्यी विशेष। सविस्तृत निवेदिले असे।।५।। वृंताक बहु द्विज निंद्य म्हणती। परि ऋषिवचनें ग्रहण करिती। मल्हारी आज्ञे कंदर्प भक्षिती। त्यासी दोष न स्पर्शिती।।६।। गोधूम पिष्टांत घृत घालून। मग उदक

घालून मर्दावे सघन। त्याचा रोडगा करावा जाण। नैवेद्यासी तो अर्पावा।।७।। चंपाषष्ठीचे दिवशी। करावा नैवेद्य देवासी। नाना पक्वान्नें ते दिवशी। देवास समर्पण करावी।।८।। जैसे असेल अनुकूल। तैसी अन्ने निर्मावी निर्मळ। मुख्य रोडगा, भरित कंदर्प प्रबळ। तो नैवेद्य देवास द्यावा।।९।। वृंताक, रोडगा, कंदर्प हे तीन। प्रश्नांचे निरूपण यथामति करून। कंदर्पाच्या उत्पत्तीचे प्रमाण। शिवपुराणी वर्णिला असे।।१०।। शिवें वर दिधला कंदर्पासी। म्हणे तू उत्पन्न करी प्रजेसी। मग तो कंदर्प त्रैलोक्यासी। मान्य झाला शिवाज्ञे करून।।११।। पुढे मणिमल्ल वधिल्यानंतरी। प्रेमपुरी राहीले शिवमल्हारी। तेव्हा सर्व देव यात्रेस हर्षनिर्भरी। येते झाले भावेकरून।।१२।। तेथे एक वृद्ध ब्राह्मण। नसे जवळी साहित्यपूर्ण। पात्रांचा असे पूर्ण अभाव। मग वैतरणी तीरी गेला तो।।१३।। तेथे गोधूम पिष्टांत घृत घालून। रोडगे केले अग्निवर भाजून। वृंताक भाजून कंदर्प मिळवून। अर्पितसे मल्हारी प्रती।।१४।। मल्हारी आला द्विजरूप धरून। म्हणे का बैसला ऐसा खिन्न। मल्हारीने जाणले तव वृत्त। तेणे पाठविले मजसी।।१५।। ब्राह्मणे नैवेद्य द्विजास अर्पिला। भक्षिता तया रुचकर लागला। मग संतोषोनी त्या द्विजाला। अति ऐश्वर्यवान करीतसे।।१६।। शिवसहाय्ये मणि मल्ल वधास्तव। कैलासाहून आले सर्व देव। शिव म्हणे पशु व्हारे सर्व। गोष्ठ (गाठा)कंठी बांधूनी।।१७।। इंद्रादि देवे आज्ञा वंदिली शिरी। गोष्ठ बांधीले कंठी निर्जरी। ते पाहून प्रसन्न त्रिपुरारी। होता झाला तये वेळी।।१८।। त्या दिवसापासून देख। गोष्ठ कंठी बांधिती सर्व। न बाधित होतसे विघ्न। प्रचीती सर्वांस होतसे।।१९।। शिवे मल्ल

वधिला ते दिवशी। आनंद जाहला सुरवरांसी। सिंहासनी बैसवूनी शिवासी। दीपिका (दिवटी) घेऊनी तिष्ठती।।२०।। त्या दिवसापासून। दीपिका प्रज्ज्वाळिती भक्तजन। तैलार्थ बुधली धारण। दक्षिण करी करीती।।२१।। मल्लासुरे वर मागितला। देता झाला शंकरभोळा। म्हणोनी प्रेमपुरी राहीला। भक्तास इच्छिले देतसे।।२२।। कोणी भावे नवस करून। इच्छिले फळ पावती जाण । ते सुवर्ण रजत मुद्रा उधळण। देवाचे अग्रभागी करिती।।२३।। मुद्रांचा झाला अभाव। म्हणोनी श्रीफळातील खोबरे जाण। उधळिती जन निजभावे करून। अत्यादरे करुनिया।।२४।। कोणी नवस करती नर। मज संतान झाले तर। प्रथम होईल ते सत्वर। तुजलागी समर्पण करु।।२५।। त्यासी प्रथम जर झाली कन्या। ती वाहोनी होती धन्य। तीच मुरळी जगी मान्या। परिचारिका होऊनी मिरवे।।२६।। वाघे होते पूर्वी व्याघ्र। अजामेळाच्या मेंढ्या समग्र। भक्षिता कोपला मार्तंड उग्र। तेव्हा सारमेय पाठवले।।२७।। मार्तंड दर्शन होता व्याघ्रांनी। मनुष्यदेह झाला त्यांसी। मार्तंड आज्ञा करी व्याघ्रांसी। श्वाना ऐसे भुंका मम सन्निध।।२८।। यात्रा परिपूर्ण झाली म्हणून। सूत्र कंठी बांधिती पीतवर्ण। हा आचार असे भाविक पण। हेच असे पोंवते याचे कारण।।२९।। पूर्वी मणिमल्ल वध करावयासी। देवासह निघाले कैलासासी। तेव्हा वृष चिन्हित ध्वजासी। देव ऋषी पूजिती।।३०।। मणि मल्ल वध झालियावरी। देवऋषींच्या हर्ष अंतरी। ध्वजोत्सार करिती निर्धारी। परम भक्ती करुनीया।।३१।। यात्रा परिपूर्ण झाली म्हणून। ध्वज शिखरासी लाविती नेऊन। हेच असे ध्वजाचे आख्यान। यथामती निवेदिले असे

।।३२।। आता पुढील प्रश्न सुंदर। शनिवार व्रत मनोहर। पिष्टाचे दीप आरती विचार। चवथे तळी भरण असे की।।३३।। तैसे बाणा पूर्णिमेचे व्रत जाण। सहावा प्रश्न जागरण। ऐसे अनुक्रमे सहा प्रश्न। आता संक्षेपी निवेदितसे।।३४।। शनिवारी प्रात:काळी उठोन। प्रात:स्मरामि मार्तंड तंत्रोक्त करून। मृत्तिका शौचादि विधी करून। स्नान यथाविधि करावे।।३५।। मुख्यत्वे निरशन असावे साचार। निशि एक याम लोटल्यावर। पूजा साहित्य अष्टगंध केशरमिश्र। पीताक्षता पूजेसी घ्याव्या ।।३६।। पायस नैवेद्य समर्पून। तांबुल दीजे त्रयोदशगुण। आणि सुवर्ण दक्षिणा देऊन। कर्पूर आरती करावी।।३७।। रविवारी देवा नैवेद्य समर्पून। दांपत्यास भोजन देऊन। बोळवावे तांबुल दक्षिणा देऊन। श्वानास भाकर घालावी।।३८।। रविवार व्रत ही असे सुंदर। रविवारी प्रात:समयी उठून। व्रताचा संकल्प मनसा करून। मौन असावे ते दिवशी।।३९।। सूर्य अस्तास गेल्यानंतरी। साष्टांगे नमस्कारे तोषवावा मल्हारी। संपादावे पूजा-साहित्य पुष्पे आदि। दवणा बिल्वपत्र अवश्य मेळवावे ।।४०।। उत्तम मिष्टान्नें करून। तोषवावे सुवासिनी ब्राह्मण। तांबुल दक्षिणा त्यांसी देऊन। साष्टांग नमस्कार करावा।।४१।। हा असे चंपाषष्ठीचा प्रकार। ऐसाच स्कंद षष्ठीचा साचार। स्कंद षष्ठीचा निर्धार। पौष शुद्ध षष्ठीस जाणीजे।।४२।। आता हिंदोळा व्रत सांगेन। करावे चैत्र शुक्ल तृतीये पासून। वैशाख शुद्ध तृतीयेपर्यंत। डोल्हारी मल्हारी-म्हाळसा पूजावी।।४३।। नाना पुष्प बिल्व दळासर। तुळस दुर्वा वहाव्या उभयतांस। नैवेद्यास दधी माषान्न वटक। देवास अत्यादरे अर्पावे।।४४।। कांदा

भजी दह्यात टाकून। भरित रोडगा कंदर्प मिश्र करून। नैवेद्य देवास समर्पून। तांबुल दक्षिणा पुढे ठेवावी।।४५।। पिष्टाचे दिवे आरती करावी। दीपिका प्रज्ज्वलीत करून पूजावी। गीत नृत्य विनोदे मल्हारी। संतुष्ट करावा निजभक्ती।।४६।। हे हिंदोळा व्रत जे करती। ते सर्व सुखाते पावती। देहांती शिवलोकी वसती। शिवसभेसी निरंतर।।४७।। सांगतो खेटीचा आता विधी। ज्यास संतान नसे पोटी। त्याने नेमे कराव्या खेटी। त्यासी पुत्ररत्न प्राप्त होई।।४८।। सूर्योदयी कऱ्हेचे करावे स्नान। आपुला नित्य नेम सारून। उदकाचा कलश भरून। अनवाणी पठारी जावे।।४९।। देवावर उदक घालून नमावे। साक्षी विनायकास नमावे। एक खेटी झाली सांगावे। नंतर देवास नैवेद्य समर्पावे।।५०।। नैवेद्यास करावे पायस कानवले। ब्राह्मण सुवासिनी भोजन द्यावे। अनुकूल नसता स्वयेच भोजन करावे। ऐसे व्रत बारा पौर्णिमा करावे।।५१।। आता एक लघु उपाय सांगेन। ज्याग्रामी राहील आपण। त्या ग्रामास प्रदक्षिणा करून। स्वगृही येऊन पूजा करावी।।५२।। दीप पुराणाचे असावे प्रमाण। त्याच्या अभावें गोधूमाचे शिजवून।अष्टकर्णिकेत आठ मध्ये एक ठेवून। दीप प्रज्ज्वलीत करून पूजावे।।५३।। स्वामीचे रूप लक्षावे नेत्रे करून। एकाग्र चित्ते करून। ओवाळावा म्हाळसा रमण। तेणे तो संतुष्ट होतसे।।५४।। तळीचा विधि आता जाणावे। विस्तीर्ण पात्री अष्टदळ काढावे। भंडारे पूरीत करावे। मध्ये कलश स्थापावा।।५५।। नागवेली दळे करून। कलश सुशोभित करावा जाण। कलशात पूर्णपात्र नारळ ठेवून। तळीकेचे पूजन करावे।।५६।। मुष्टी भंडार आत ठेवावा।

येळकोट नामोच्चार करावा। तळी उचलून आधार पात्री ठेवावा। भंडार सर्वास लावावा।।५७।। चैत्र शुद्ध पौर्णिमेस जाण। मार्तंड रुप धरी मल्लदहन। माही पौर्णिमेस राहू हनन। मोहिनीरुप धरूनी करीतसे।।५८।। पौषी पूनवेस म्हाळसीचे लग्न। श्रावणी पौर्णिमेस बाणार्पण। ऐशा चार पौर्णिमा प्रमाण। सांगितल्या असती।।५९।। चैत्री पौर्णिमेस सुगंधी जल समर्पावे। वैशाखीस लाडू बुंधीचे। ज्येष्ठीस जिलबी आषाढीस तांबुल। भाद्रपदीस केतकी पाने अर्पावी।।६०।। अश्विनीस पय जायफळादि लावून। कार्तिकीस गोधूम पिष्टाचे दीप। मार्गशिर्षीस उडदाचे वटक तळून। पौषीस लाडू तीळाचे अर्पावे।।६१।। माही पौर्णिमेस क्षिप्रा अर्पावी। फाल्गुनीस सुवर्णपुष्पे वहावी। अभावी कोरांटीची पुष्पे द्यावी। परम भक्तीभावे करूनी।।६२।। अधिक मासी पौर्णिमेस। अनारसे करावे तीनशे पंचवीस। देवास समर्पून ब्राह्मणास। यथासुखे घालावे।।६३।। आता कथितो विधी जागरण। वाघे मुरळयांस करावे निमंत्रण। ब्राह्मण सुवासिनी बोलावून। घालावे मिष्टान्न भोजन।।६४।। चौक भरावा गव्हाचा प्रमाण। वरी पाच इक्षुदंड बांधोन। मध्ये पुष्पांची माळ गुंफून। बहुसंभ्रमे बांधावी।।६५।। भंडार ठेवावा विपुल। येळकोटी नाम उच्चारावे वेळोवेळ। वाघे मुरळ्या गायनें मैराळ। परम संतोष पावतसे ।।६६।। हास्य गीत विनोदे करून। निशी क्रमावी सुप्रसन्न असून। मग सर्वांस तांबूल देऊन। जागर समाप्तीस नेईजे।।६७।।आता चंपाषष्ठी, स्कंदषष्ठीव्रत। मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी रविवार। शततारका नक्षत्र कुंभी निशाकर। ते दिनी प्रेमपुरी लिंग गोचर झाले।।६८।। याकारणें प्रदिपदे पासून पुरण।

षष्ठीपर्यंत घालावयाचा नेम। ब्राह्मण सुवासिनी भोजन। षष्ठीचे दिवसापर्यंत करावे।।६९।। प्रतिप्रदेपासून दहा ब्राह्मण। नित्य घालावे भोजन। षष्ठीचे दिवशी अभिषेक करून। पूजा यथासांग करावी।।७०।। हे जर नसेल अनुकूल। तरी एक द्विजास भोजन। निदान षष्ठीस ब्राह्मण भोजन। अन्ने करूनी संतोषवावे।।७१।। अनुकुलते प्रमाणे पक्वान्नें। मुख्य त्यात असावे पुरण। रोडगा वृंताकभरीत करावे मेळवून। रोडगा गोधूम पिष्टाचा करावा।।७२।। नंतर तळिकेचे पूजन करून। स्वकीय परकीय मेळवून। येळकोट नाम उच्चारून। पात्र स्वकरे उचलीजे।।७३।। प्रसाद सर्वांस देईजे। भंडार सर्वांस चर्चिजे। दीपिकेचे विसर्जन कीजे। तीर्थ सर्वांस देईजे।।७४।।साष्टांग नमन तीन करून। स्तवनी तोषविजे म्हाळसारमण। मग दांपत्यास घालावे भोजन। तांबुल दक्षिणा देऊन बोळविजे।।७५।। देवाचा नैवेद्य झाकून ठेवावा। आपण निरशनाचा फराळ करावा। रात्रौ जागर करावा। भंडार विपुल देवास अर्पावा।।७६।। हे संकट आदित्यवार व्रत। साधक करिती भावयुक्त। त्यांचे कार्य सफळ होत । प्रमाण एकवीस आदितवार।।७७।। कार्य सिद्धी झालियावरी। व्रतसमाप्ती करावी निर्धारी। एकवीस दांपत्ये असावी बरी। अवांतर अनुकुलते करून।।७८।। दांपत्यास धूप दीप दाखवून। मल्हारी - म्हाळसा रुप जाणून। नमस्कार साष्टांग घालून। संकल्प सोडून भोज कीजे ।।७९।। तांबुल दक्षिणा देऊन। दांपत्य बोळविजे वंदून चरण। या व्रतास नसे हवन। व्रत सफलता अन्नदानें।।८०।। मल्लासुराने वर मागून। मनुष्यहितासी गोविला पंचवदन। म्हणूनी लिंगरुपी भगवान।

भक्त कामना पुरवितसे।।८१।। आता वर्णु नैवेद्याचा विचार। मार्गशीर्ष मासी चित्रान्न। मुख्य केशर शर्करा ओदन। अभावे वृंताक ओदन त्या अभावे खिचडी।।८२।। पौषमासी तीळ लावून। भाकरी कराव्या सूक्ष्म विस्तीर्ण। वरी नवनीत विपुल ठेवून। श्रीस नैवेद्य समर्पावा।।८३।। माघमासी पुरण घालुन। पोळ्या कराव्या सूक्ष्म विस्तीर्ण। परमान्न दुग्ध खसखशी करून। परम भक्तीपूर्वक अर्पावे ।।८४।। फाल्गुनमासी माषान्नाचे वटक। दधी असावे आंबट साजुक। तीळवडे आणि पर्पटक। अवांतर अन्नें करावी।।८५।। चैत्र वैशाख दोन मास। दध्योदन द्यावे ब्राह्मणास। दध्योदन पूजा बांधावी देवास। परम भक्ती करूनीया।।८६।। ज्येष्ठमासी आंब्याचा रस। आषाढमासी सिद्धान्न। भाद्रपद मासी पुरणाचे मोदक। आश्विन मासी पय केशरयुक्त।।८७।। भागीरथीच्या कावडी थोर। नेऊन घालती रामेश्वरावर। ऐशा बारा कावडी दुर्धर। करिता राज्य पावे देहांती।।८८।। परी पहा जयाद्रि पर्वतावर। नांदतसे म्हाळसावर। याजवर कऱ्हेचे उदक घालती नर। ते परमपद पावती।।८९।। देव नाम गणास शिव म्हणे औषधी होई। असो सुगंध तुझे ठायी। मज प्रिय होशील निश्चयी। त्रैलोक्यात मान्यता पावसी।।९०।। त्या दिवसापासून। दवणा वाहती देवास नेऊन। तुळसी बेल यांहून। प्रिय असे मल्हारी स्वामीसी।।९१।। माघ वद्य चतुर्दशीपासून। वैशाख वद्य अमावस्या प्रमाण। शीतळ उदकें पंचवदन। गळती धरूनी तोषविजे।।९२।। मल्लासुरे वर मागितला। जे उग्र नवस करतील तुला। त्यांचे नवस पुरवावे दयाळा। हेची मागणे तुज असे।।९३।। कणकेचे पशुवध करती नवस बोलून। होई विचारांची उत्तम गती

प्राप्त। तैसे नवसकर्त्याचे आर्त। दीनदयाळ म्हाळसावर पुरवी।।९४।। हाळाचा नवस करून। प्रार्थिती जे मल्लमर्दन। त्यांचे नवस पुरवी हयवाहन। तेव्हा हाळावर चालती।।९५।। देव म्हणती तव द्वारीचे भिकारी। दैत्यकुळ दातारी संहारी। आमची येरझार सफळ करी। हेची वारी मागतसे।।९६।। हासोनी बोले चंद्रमौळी। म्हणे रे तुम्ही प्रार्थिले येऊनी। तरी हा वारी शब्द भूतळी। विख्यात असो मम आज्ञा।।९७।। त्या दिवसापासून। वारी मागती निराभिमान होऊन। हेची असे एक अनुष्ठान। विधियुक्त करता फळप्राप्ती।।९८।। कैलासीहून मदनदहन। निघे मणिमल्ल वधालागुन। तेव्हा घोळका वाद्य लोहाचे निर्मुन। हाती घेऊन वाजवीतसे।।९९।। हे वाद्य प्रिय मार्तंडासी। ते कृपेने दिधले वाघ्यांसी। म्हणे हे वाद्य वाजवुनी वारीसी। मागोनी उपजीवन करावे ।।१००।।

श्री मल्हारीमार्तंड देवता चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

हा अध्याय करीता पठण। ठेवी भाव प्रसन्न चित्त। चिंतन करावे मल्हारीमार्तंड। सर्व कारज तुम्हीच पुरवी। विकट संकट काळी दुष्ट ग्रहांच्या काळी। वा साडेसाती काळी। चिंतन करूनी मार्तंडासी। भक्तांचा दुष्टभोग तो जाळी।

।। श्री ।।

# ।। सखोलज्ञान संपत्ती अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री मल्हारीमार्तंडाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री स्वामी समर्था तुज शरण। भक्त गणेश करितो वंदन। श्री मार्तंड नवशती होतसे पूर्ण। केवळ तव कृपा हेची कारण।।१।। श्री मार्तंड माहात्म्य वर्णावया। दिली शक्ती या गणेशाला। तेणे जातसे ग्रंथ पूर्णतेला। भक्त गणेश नम्र तव चरणी।।२।। आता वर्णितो मल्लासूराचे जन्मांतर। पूर्वी मधुकैटभ दैत्य बलसंपन्न। तेणे युद्धी जिंकला लक्ष्मीरमण। विष्णुने वर मागुन त्यांसी वधिले।।३।। दैत्य म्हणाले तुज युद्धि जिंकीले। वाटे महामाया अन् शिव जिंकावे। विष्णु म्हणे पुढे दैत्यकुळी जन्मावे। आपले मनोरथ पूर्ण करावे।।४।। पुढे कश्यपाची भार्या दिती। सर्वात श्रेष्ठ ती निश्चिती। तिचे उदरी हिरण्याक्ष हिरण्यकश्यपु। दैत्य जन्मले परमप्रतापी।।५।। ज्येष्ठ हिरण्याक्ष बलसंपन्न। तेणे तोषविला कमळासन। त्यापासून वरप्रसाद लाधून। त्रैलोक्याधीश झाला तो।।६।। देवांस झाले दुःख दारूण। त्यांनी ब्रह्मदेवास

स्तवुन। सुप्रसन्न केला कमळासन। म्हणती हिरण्याक्ष समुद्री गेलासे।।७।। ब्रह्मदेवे स्तविला लक्ष्मीपती। तयासी शिंक आली सहजी। तत्काळ नासिकातून पडली आळी। ती सूकररुपें विष्णुमूर्ती अवतरली।।८।। नारद जाऊन सांगे हिरण्याक्षाला। हिरण्याक्ष उसळून जळाबाहेर आला। नारद सांगे वृत्त वराहाला। वराह अति दारूण क्षोभला।।९।। त्याने जळात उडी टाकून। हिरण्याक्ष केशी कवळिला पूर्ण। पृथ्वी दाढेवर ठेवून। दैत्यासी दारूण युद्ध केले।।१०।। असूर परमप्रतापी रणशूर। वराह युद्धी केला जर्जर। मग धरूनीया निशाचर। वराहे चिरोनी दोनी शकले केली।।११।। हिरण्याक्षाचा बंधु कनिष्ठ। हिरण्यकश्यपू दैत्य दुष्ट। तेणे ब्रह्मदेवास केले तुष्ट। त्यापासून तेणे वर मिळविला।।१२।। त्या हिरण्यकश्यपुचे उदरी। तीन पुत्र जन्मले दुराचारी। परी ज्येष्ठ विष्णुभक्त निर्धारी। जन्मला असे अति पवित्र।।१३।। प्रल्हाद ज्येष्ठ पुत्र विष्णुभक्त। अनुहाद अनिवार अति उन्मत्त। निऱ्हाद बहु प्रतापी विख्यात। जनांस पीडाकार अनुहाद निऱ्हाद।।१४।। यांजपासून दैत्यांची उत्पत्ती। प्रसार झाला त्रिजगती। शुंभ निशुंभ दैत्यपती। निऱ्हाद कुळी जन्मले।।१५।। त्यांनी युद्ध केले दारूण। महामाया तोषविली युद्ध करून। शेवटी महामाये हाती निधन। पावते झाले दैत्यपती।।१६।। तेच मणिमल्ल नामे प्रतापी शूर। त्यांनी युद्धी तोषविला शंकर। ऐसे मणिमल्लाचे जन्मांतर। संक्षेपे येथे निवेदिले ।।१७।। मणि दैत्य प्रतापवंत। उत्पन्न केला नूतन पर्वत। त्याचे नाव मणिचूल निश्चित। नाव ठेवीले दैत्येश्वरे।।१८।। हे मणिचूल पर्वताचे अभिधान। व्हावयाचे असे कारण। आता श्वान का प्रिय त्याचे

वर्णन। संक्षिप्तपणे सांगतो।।१९।। बळीस पाताळी घाली शारंगधर। तेव्हा बळीचे द्वारी होऊनी किंकर। दैत्याची उदार शक्ती पाहून थोर। संतोषाते तो पावला।।२०।। परी अंतरी सुख न वसे। तेणे बळीचा द्वारपाल झाला असे। ते सामवेद गातसे। तेणें वामन क्षोभला।।२१।। म्हणे रे समय न लक्षिता। गात बैसलासी तू आता। श्वान होऊन फिरे भ्रांता। मृत्युलोकी निजकर्मे।।२२।। साम वेद तयासी शरण गेला। वामने तया उ:श्याप दिधला। शिवद्वारी राही तू सदा। तोच करील तुझे उद्धरण।।२३।। मणि युद्धास प्रवर्तला। जाऊनी अश्वावर बैसला। हे पाहून शंकर भोळा। चंद्रालागी आज्ञा करी।।२४।। शिवाज्ञे अश्व झाला निशाकर। त्या अश्वावर शिव झाला आरूढ। दैत्यमस्तक टाकीले छेदून। तेव्हापासून अश्व वाटत प्रिय शिवासी।।२५।। कोणे एके अवसरी। सुशर्मा ब्राह्मण दुराचारी। वाघ्यासी म्हणे तुझा मल्हारी। भवबंधन कसे तोडीतसे।।२६।। हे लोहाची शृंखला दुर्धर। कंठी बांधोनी करी नामोच्चार। एकदा आसडिता तुटली तर। सत्य आम्हासी वाटेल।।२७।। वाघ्या बोले ब्राह्मणासी। लंगराची कथा ही कायसी। त्रैलोक्य पालथे घालावयासी। स्वामी माझा समर्थ असे।।२८।। तेणे ब्राह्मण अंगी झाला भ्रम फार। आरोळी तो मारी वारंवार। त्याची स्त्री रडे दीर्घ स्वरेकरून। जन सर्व अति घाबरले।।२९।। त्याची पत्नी करी नवस। म्हणे अनवाणी येऊ यात्रेस। वारी मागे शुष्क धान्यास। शंका चित्ती न धरिता ।।३०।। नेमें करी ती तीन संवत्सर। ब्राह्मण पीडीत असे फार। परी स्त्रीचा पाहूनी निर्धार। संतुष्ट झाला म्हाळसापती।।३१।। त्या दिवसापासून नंतर। वाघे लंगर स्कंधी करती धारण। लंगर तोडीती

आवेशेकरून। मल्हारी नाम उच्चारूनी।।३२।। आता सांगु पंचप्रश्न निश्चिती। श्रीमार्तंड खड्गाची उत्पत्ती। आणि तैसेची अष्टविधाभक्ती। मुंडन तीर्थश्राद्ध उपवास जाणीजे।।३३।। अश्विनमासी शनिवार जागर। भक्तांस अष्टभोग देणार। ऐसे पाच प्रश्न सुंदर। यथामति निवेदन केलेसे।।३४।। वैशंपायन सांगे जनमेजयासी। असे हे खड्ग दारूण निश्चिती। शिवे खड्ग दिले अश्वत्थाम्यासी। याचे कारण असे आहे।।३५।। कुरुक्षेत्री सर्व कौरव निमाले। अश्वत्थामा कृपाचार्य उरले। ते दोघे जेथे दुर्योधन रणी पडले। तेथे आले शोधत।।३६।। अश्वात्थामा बोले दुर्योधनालागून। राया तुझे शत्रु स्वकुळेसी वधीन। पाच पांडवांची शिरे काढून। तुझे चरणी अर्पिन मी।।३७।। पांडवसैन्यव्यूह असे दुर्धर। द्वारी रक्षक त्रिपुरहर। अश्वत्थामा शिवास पाहून। साष्टांग घाली लोटांगण।।३८।। अश्वत्थामा कर जोडून करी स्तवन। तोषविला त्याने मृडानीरमण। शिव बोले प्रसन्न होऊन। इच्छित वर मागे का।।३९।। अश्वत्थामा म्हणे उमापती। पांडव मारावयाची खंती। हेची मागणी पशुपती। दुजी इच्छा मज नसे।।४०।। शिव म्हणे ऐक रे वचन। या सैन्यात असलीया पंडुनंदन। तुझे हाती पावती मरण। हे काळखड्ग घेई का।।४१।। पांडवसैन्यी गेला द्रोण नंदन। तव निद्रिस्त होते द्रौपदीनंदन। जैसे पांडव तैसेची सलक्षण। पाहता दुजे न दिसती।।४२।।अश्वत्थामे वीरश्री करून। पांडव म्हणुनी वधिले पाच जण। पाच मस्तके करी घेऊन। दुर्योधना सन्निध पातला।।४३।। दुर्योधन म्हणे वंश क्षय केला। पांडवशिरे नव्हेत कळले मला। ऐसे बोलून त्याने प्राण सोडला। हर्षविषादे करूनीया।।४४।। हे काळखड्ग

शिवास कैसे मिळाले। भीष्मास धर्मराये विचारले। ते गंगात्मजे निरोपिले। पंडुपुत्रांस ते समयी ।।४५।। पूर्वी पाप झाले विशेष जाण। म्हणोनी इंद्रादि देव संपूर्ण। ब्रह्मदेवास सर्व गेले शरण। अति दु:खित होऊनिया।।४६।। मग विधी देवांसी आज्ञा करी। त्वरीत जावे हिमनग शिखरी। यज्ञ तेथे करीन निर्धारी। स्थळ विस्तीर्ण तुम्ही करा।।४७।। इंद्रादिंनी आज्ञा वंदिली शिरी। त्वरीत गेले हिमालय शिखरी। शतयोजन स्थळ कलाकुसरी। निर्मिते झाले देव सर्व।।४८।। तेथे ब्रह्मदेवे येऊन। याग केला संवत्सर तीन। पूर्णाहुती होता शब्द कडकडून। आकाशांत उठला असे।।४९।। तव निकट पातला पाकशासन। तेणे खड्ग देखिले दारूण। ब्रम्हदेवास सांगे तो वर्तमान। परम हर्षे करूनीया ।।५०।। विधीने खड्ग घेतले करी। म्हणे हे खड्ग विश्वसंहारी। काळखड्ग नाम ठेविले ते अवसरी। देवांस बहु आनंद झाला।।५१।। विरंचीने खड्ग घेऊन। रुद्रास दिल्हे आदरें करुन। म्हणे दैत्यजाती दारूण। त्यांचा संहार त्वरीत करी।।५२।। रुद्रें म्लेंच्छ संहारीले संपूर्ण। त्याची खड्गे दक्ष पावला मरण। वीरभद्र वीजयी होऊन। शिवासन्निध पातला।।५३।। आता झाले खड्ग आख्यान। श्रवण करविले यथामति करून। आता ऐका नवविध भक्ती आख्यान। श्रवणें पातकें भस्म होती।।५४।। प्रथम दैवीभक्ती जाण। दुसरी मानुषी प्रमाण। तिसरी राक्षसी करून। तुष्टविती स्वामीसी।।५५।। चवथी पिशाची भक्ती। पाचवी पाही असुरी भक्ती। सहावी कौमारी भक्ती। सातवी योगिनी जाणीजे ।।५६।। आठवी राजसी भक्ती। नववी सात्विकी भक्ती। याचे निरुपण जयाद्रि माहात्मी। सांगितले

असे अनुक्रमें।।५७।। या नवविधा भक्ती संक्षेपे करून। वर्णिल्या जयाद्रि माहात्म्या वरून। अन्यत्र श्राद्ध-तीर्थ उपवास मुंडन। हे सर्वत्र असते जाणीजे।।५८।। परी ही स्वामीची राजधानी। जया अभिधान त्रिभुवनी। विख्यात असे ही सर्व जनी। येथे तीर्थश्राद्ध उपवास मुंडन नसे।।५९।। अश्विन मास परम नागर। या मासी येती शनिवार। त्या दिवशी करावा निराहार। परमभक्ती करुनीया।।६०।। शनिवारचे रात्रीस। पूजा मेळवावी बहु सायास। महात्म्य या मंत्रे दुग्धाभिषेकास। करावे परमप्रीती धरुनीया ।।६१।। नानाविध पक्वान्नें करून। नैवेद्य समर्पावा यत्नेकरून। नाना वाद्यें गीत नृत्य करून। तोषवावे मल्हारी स्वामीसी।।६२।। या व्रताचे महिमान। म्हाळसा सांगे विधातिया लागुन। अपार संपदा पावून। अंती वसे शिवलोकी।।६३।। अनंत जन्मीचें पुण्य गाठी। तरी मल्हारी भक्ती उपजे पोटी। हेची म्हाळसा कृपा दृष्टी। विधातियास सांगतसे।।६४।। आता सांगीन प्रश्न सुंदर। मानसपूजाविधी साचार। प्रतिमा पूजा विधी निर्धार। करीन वर्णन यथामती।।६५।। मृत्तिकेचे मार्तंड पार्थिव। धान्य पूजा विधी सर्व। गंधपूजा उष्णकाळी पर्व। पाहूनी अवश्य करावी।।६६।। अनुकुलता आलियावर। रत्नपूजा करावी निरंतर। नसलिया मानसपूजा उपचार। पूजेने म्हाळसाकांत संतोषे।।६७।। मानसविधी यास प्रमाण। आचार्ये श्रीदेवीची जाण। तैसीच तंत्रीची पाहून प्रमाण। श्री मार्तंड पूजा केली असे।।६८।। तैसाच गणपति पूजाविधी। तैसाच शिवमानस पूजाविधी। तैसाच विष्णु मानस पूजाविधी। चवषष्ट उपचारें लिहीले असे।।६९।। भगवद्गीतेत तेरावे अध्यायी। अर्जुनास सांगे उदधि जावई। गुरुउपासना

मार्ग सर्वही। विस्तार श्रीज्ञानदेवें केला असे। ।७०।। नारदे उपदेशिले ध्रुवासी। पाहावया मानस पूजेसी। तै शिवे उपदेशिले उमेसी। परमप्रीती करुनीया। ।७१।। म्हाळसा सांगे विधीसी। तो विधी भैरव तंत्री असे निश्चयेसी। शिवगीतेत सोळावे अध्यायासी। रामचंद्रास सांगे उमापती। ।७२।। मानसपूजेचे विधान। यास नसे आसनविधी जाण। मग भूतशुद्धी आदिकरून। कारण नसे जाणीजें। ।७३।। चालता बोलता निजता। जेव्हा स्मरण होईल चित्ता। ध्यानी आणून म्हाळसाकांता। मन इच्छित पूजा करावी ।।७४।। संपूर्ण कल्पनेचा खेळ। येथे मन न कीजे दुर्बळ। पूजा द्रव्य कल्पा विपुल। इच्छित पदार्थ जाणीजे। ।७५।। प्रतिमेचे पूजन ऐसे करावे। सकळ पूजासामग्री मेळवावे। वेदोक्त मंत्रे पूजावें। श्री मैराळाप्रती। ।७६।। शुद्ध मृत्तिका करून। चतुष्कोणी लिंग करावे जाण। पुढे परिनलिका करून। पुढे अश्वमुख करावे। ।७७।। वर दोन पिंडी कराव्या। घोटून कराव्या बरव्या। पुढे गणपती षष्णमुख गोळया। आकृती करूनी ठेवीजे। ।७८।। चार आयुधें चार दिशे। आकृती करूनी ठेवावे सायासे। तीन गोळी एकत्र ऐसे ही दिसे। अग्रभागी ठेवीजे। ।७९।। डमरू सन्निध घृतमारीची गोळी। मणिमल्ल मस्तके चरणाजवळी। मल्लाचे पुत्र महाबळी। पर्वत ऐसे पाच गोळया लावीजे। ।८०।। श्वानाची एक गोळी साचार। तीन गोळया एकत्र तोच नंदी सुंदर। मार्तंड पिंडी गोळी गंगा निर्धार। ग्रंथी लेख ऐसाच असे। ।८१।। वरी नाग करावा फणीचा। पूजनास नेम धरावा साचा। मनी विटाळ कल्पनेचा। येऊ न द्यावा बहु यत्नें ।।८२।। तंत्रोक्त प्राण प्रतिष्ठा ध्यान। तंत्रोक्त मंत्रें करावे पूजन। वरी भंडार विपुल वाहुन। अति

स्तवनी संतोषविजें।।८३।। 'मृण्मयोऽपि'च मंत्रे प्रार्थना करून। आनंदविजे म्हाळसारमण। तुलसी, बेल, दुर्वादि पुष्पें संपूर्ण। लिंगावरी वहावी।।८४।। नंतर भावे निरांजन करून। मंत्र स्तोत्रें माहात्म्यादि जाण। अग्रभागी भक्तीने वाचून। मग विसर्जन करावें।।८५।। गोधून उत्तम निवडून। शाळुंका भरावी आदरें करून। वरी तांदुळ बारीक धुऊन। विकसित करूनी ठेवीजे।।८६।। हरीत रंग सुंदर। तांबडा रंग मसुरदाळ परिकर। पीत रंग हरभरा डाळ साचार। काळा रंग तीळाचा।।८७।। ऐसी धान्ये निवडून। स्वच्छ करावी धुऊन। त्यांसी शुष्क घृत चर्चुन। परम तेजस्वी करावी।।८८।। शाळुंकेवर स्वस्तिकें कमळें। तैसीच सर्वतोभद्रे निर्मळे। रावे मयूरें विशाळें। कौतुके करूनी तोषविजे।।८९।। हा धान्यपूजेचा क्रम सुंदर। दुसरा गंधपूजेचा निर्धार। यास चैत्र वैशाख मास मनोहर। वसंत काळ असावा।।९०।। चंदन सुवासिक मेळवून। विपुल मेळवावा शुभ्र पितवर्ण। कुंकुमाचे गंध करून। पूजा लिंगावर बांधावी।।९१।। शाळुंकेस शुभ्र गंध लावून। वरी पीत रक्त गंधांची कौतुके करून। स्वस्तिके कमळे शुक-मयूरे जाण। अतीप्रीती करावी।।९२।। पींडीवर पीत गंधाची मुखें करावी। अवतार चरित्रें बरवी। केळीची पानें हिरवी। रंगालागी लावावी।।९३।। पुष्पे तुळसी बेल दवणा वाहून। धूपदीपादि उपचार दाखवून। नैवेद्य विविध पक्वान्न। अनुकुलते प्रमाणें करावे।।९४।। हा गंध पूजेचा क्रम निर्धारी। कामना धरून जन्मजन्मांतरी। मानसपूजे पूजिला मल्हारी। तो सभाग्य नांदे धरेवरी।।९५।। यास मार्तंडविजय तैसा मल्हारीमाहात्म्य आधार। तिसरा जयाद्रिमाहात्म्य साचार।

चौथा केदार कल्पींचा सुंदर। कौतुकार्य घेतला असे।।९६।। पाचवा पद्मपुराणीचा इतिहास। सहावा लिंगपुराण निर्दोष। सातवा पाताळ खंडीचा इतिहास। आधारासी घेतला असे।।९७।। आठवा भविष्योत्तर पुराण। जेथे निकुंभासुर असे शिवगण। मल्लासुराचा पौत्र जाणून। कथा विस्तारें लिहीली असे।।९८।। नववा स्वामींचा आर्शिवाद। स्वामींनी चिंतनातूनी कथिले। सहायता घेऊन अनेक ग्रंथींची। आदेश दिला नवशती ग्रंथाचा।।९९। मी गणेश स्वामी भक्त लीन। स्वामी कृपेचाच आधार पूर्ण। तेणें आज्ञा दिधली म्हणून। ग्रंथ नवशती निर्मिला।।१००।। ग्रंथ लिहावया घेता हाती। बुद्धीस प्रेरक म्हाळसापती। ही असे स्वामीकृपा निश्चिती। भक्त गणेश धन्य झाला ।।१०१।।

श्री मल्हारीमार्तंड चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

हा अध्याय करीता पठण। जन्म जन्मांतरी पापाचे होईल शोधन। स्वप्नी दर्शन होऊनी मार्तंड कृपा। आशिर्वाद दिधला भक्तासी। करोनी मानसपूजा प्रतिदीन तुम्हीच उजळावे हे मुढ जीवन।

## ।शङ्कराचनम्।

श्री स्कन्दाग्रजायनमः

विश्वमान्य-विश्वनाथ-विश्ववन्द्यमीश्वरम्।
देवदेवमहादेवं देववृन्दवन्दितम्।।
प्रमथनाथं, भूतनाथं, नारदादिवर्णितम्।
तं स्मरामि तं भजामि तं नमामि शङ्करम्।।१।।

ॐ नमः शिवाय।

मन्थनेनमुद्भवं विषंधरं धुरंधरम्।
विष्णुपादमुद्भवं सुरनदीं जटाधृतम्।
किशोर चन्द्रशेखरं स्फुरत्फणाफणिधरम्।
तं स्मरामि तं भजामि तं नमामि शंङ्करम्।।२।।

ॐ नमः शिवाय।

मखेमृतांसतीं विलोक्य रौद्ररुप धारकम्।
वीरभद्रनिर्मितं दक्षयज्ञनाशकम्।।

विचित्रनृत्यनाटितं विकटहास्य हासितम्।
तं स्मरामि तं भजामि तं नमामि शङ्करम्।।३।।
ॐ नमः शिवाय।
अनङ्गरंगभंजकं त्रिअम्बकं पुरान्तकम्।
चिताभस्मधारकं चित्तवृत्तिरोधकम्।
तपोनिधिं महामुनिं चिदानन्दकन्दकम्।
तं स्मरामि तं भजामि तं नमामि शङ्करम्।।४।।
ॐ नमः शिवाय।
भक्तवृन्दसेवितं चिदम्बरं दिगम्बरम्।
राघवेन्द्रपूजितं धराधरेन्द्रवन्दितम्।।
जनानन्ददायकं मङ्गलप्रदायकम्।
तं स्मरामिं तं भजामि तं नमामि शङ्करम्।।५।।
ॐ नमः शिवाय।

रामात्मजः

।अथ श्री मल्हारी मानस पूजा।

नमो स्वामीराजं दत्तावतारम् श्री विष्णु ब्रम्हा शिव शक्ति रुपम्।
ब्रह्मस्वरुपाय करुणाकराय स्वामी समर्थाय नमो नमस्ते।
नमन करुनी सद्‌गुरु स्वामीसी सिद्ध करी या मल्हारी मानस पूजेसी।
ॐ चैतन्य श्री मल्हारी मार्तंड जागृत जागृत जागृत स्वाः।
हे मल्हारीमार्तंडा हे कृपाळा मला ध्यानमूर्ती दिसू देई डोळा।
कुठे माय माझी म्हणे बाळ जैसा समर्था तुम्हांवीण हो जीव तैसा।।
मल्हारीमार्तंड तुम्ही स्मर्तृगामी हृदयासनीं या बसा प्रार्थितो मी।
पूजेचे यथासांग साहीत्य केले मखरात स्वामी मल्हारी बैसविले।।
महाशक्ति जेथे उभ्या ठाकताती जिथे सर्व सिध्दी पदीं लोळताती।
असे सर्व सामर्थ्य तो हा समर्थ परब्रह्म साक्षात् मल्हारी मार्तंड।।
सुवर्णताटी महारत्न ज्योती ओवाळूनी अक्षता लावूं मोती।
शुभारंभ ऐसा करुनी पूजेला चरणांवरी ठेवू या मस्तकाला।।

हा अर्घ्य अभिषेक स्विकारी माझा तुझी पाद्यपुजा करी बाळ तुझा।
प्रणिपात साष्टांग शरणागताचा तुम्हां वाहिला भार या जीवनाचा।।
ही ब्रह्मपूजा महाविष्णु पूजा शिव शंकराची असे शक्तिपूजा।
दही दूध शुध्दोदकाने तयाला पंचामृत स्नान घालू प्रभूला।।
वीणा तुताऱ्या किती वाजताती शंखादी वाद्ये पहा गर्जताती।
म्हणती नगारे श्री मल्हारीमार्तंड श्री शिव सदाशीव तुही महादेव।।
प्रत्यक्ष गंगा जलकुंभी आली श्री मल्हारीमार्तंडासी ती स्नान घाली।
महासिध्द आले पदतीर्थ घ्याया महिमा तयाचा कळे ना जगा या।।
मी धन्य झालो पदतीर्थ घेता घडू दे पूजा ही यथासांग आता।
अजानुबाहू दिव्य कांती सतेज तु ही  मल्हारीमार्तंड खरा स्वामीराज।।
प्रत्यक्ष देवाधिदेव तु मल्हारीमार्तंड तया घालुया रेशमी वस्त्रसाज।
सुगंधीत भाळी टिळा रेखियेला शिरीं हा जरी टोप शोभे तयाला।।
वक्ष:स्थळी  हो टिळा चंदनाचा सुवास तो वाढवी भाव साचा।

शिरी वाहुया बिल्व तुलसी दलाते गुलाब जाईजुई अत्तराते।।
गंधाक्षता वाहुनी या पदाला ही अर्पूया जीवन पुष्पमाला।
चरणी करांनी मीठी मारुं देई म्हणे ‘लेकरासी सांभाळ आई’ ।।
इथे लावूया केशर कस्तुरीचा सुगंधात हा धूप नाना प्रतीचा।
पूष्पांजली ही तुम्हा अर्पियली गगनातूनी पुष्पवृष्टी जहाली।।
करुणावतारी अवधूत किर्ती दयेची कृपेचीच जी शुध्द मूर्ती।
प्रभा फांकली शक्तिच्या मंडलाची अशी दिव्यता मल्हारीमार्तंडाची।।
हृदयमंदिराची ही स्नेहज्योती मला दाखवी मार्तंडाची योगमूर्ती।
करु आरती आर्तभावे प्रभूची सदाशीव श्री स्वामी मल्हारीमार्तंडाची।।
पंचारती ही असे पंचप्राण ओवाळूनी ठेऊ चरणांवरुन।
निघेना पुढे शब्द बोलूं मी तो ही मनीचे तुम्ही जाणतां सर्व कांही।।
हे मल्हारीमार्तंडा बसा भोजनाला हा पंचपक्वान्न नैवद्य केला।
पुरणाची पोळी तुम्हां आवडीची लाडू करंजी असे ही खव्याची।।

कंदर्प वार्ताखी गोधुम रोट चांगला रुचकर असा जो तया भावला।
डाळींबे द्राक्षे फळे आणि मेवा हे केशरी दूध घ्या स्वामीदेवा।।
पुढे हात केला या लेकराने प्रसाद द्यावा अपुल्या कराने।
तांबुल घ्यावा हे मल्हारीमार्तंडा चरणाची सेवा करु द्यावी आतां।।
प्रसन्नतेतून मागूं मी काय हृदयी ठेव माते तुझे दोन्ही पाय।
सर्वस्व हा जीव चरणीच ठेऊ दूजी दक्षिणा ती मी काय देऊ।।
नको दूर लोटू आपुल्या मुलाला कृपाछत्र तुमचेच या बालकाला।
घालूनी प्रदक्षिणा सुंदर या ब्रह्मांडाला अमोल परब्रह्म दाखवावे आपुल्या मुलाला।।
धरुं दे आतां घट्ट तुझ्या पदाला पदी ठेऊ दे शीर शरणागताला।
यळकोट यळकोट म्हणूनी तळी उचलली आनंदात राहुनी त्या भंडारा उधळला।।
हृदीं भाव यावे असे तळमळीचे करी पूर्ण कल्याण हे या जीवाचे।
तुझे बाळ पाही तुझीच वाट देवा नका वेळ लावू शिरी वरदहस्त ठेवा।।
मनी पूजनाची असे दिव्य ठेव वसो माझिया अंतरी श्री मल्हारीदेव।

नमो माऊली साऱ्या जगाची हितकारी तुझ्यावीण नाही कोणीखरा उपकारी।
प्रथम नमन माझे दयाळू कृपाळू धरणी मातेसी।
सिध्दी द्यावी आता या मल्हारीमार्तंड पूजेसी।।
श्री मल्हारीमार्तंडापर्णमस्तु